रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३४१
www.ramprahar.com

शुक्रवार, २८ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## दिलासा! सामान्य ग्राहकांना प्रीपेड स्मार्ट मीटर नाहीत



**मुंबई :** काही दिवसांपूर्वी महावितरणने राज्यातील सर्व ग्राहकांच्या घरी प्रीपेड स्मार्ट मीटर बसवण्याची घोषणा केली होती. त्यास जनतेने विरोध दर्शविला. याची दखल घेत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रीपेड स्मार्ट मीटरचा निर्णय मागे घेण्यात आला असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार महावितरणने सामान्य ग्राहकांच्या घरी प्रीपेड स्मार्ट मीटर बसवले जाणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे. महावितरणने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, सुधारित वितरण क्षेत्र योजनेद्वारे सिस्टीम मीटरिंग अंतर्गत सबस्टेशनमधील सर्व फीडरवर तसेच वितरण रोहित्रांवर आणि सर्व सरकारी कार्यालयांमध्ये स्मार्ट मीटर बसवण्यात येत आहेत. सर्वसामान्य ग्राहकांच्या घरी मात्र प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येणार नाहीत.

### अंतरंग

कोकणातील गणेशभक्तांचा प्रवास होणार सुसाट!/२

पोलादपुरातील झुलता पूल पुनर्बांधणीस निधीची प्रतीक्षा/५

द. आफ्रिका फायनलमध्ये; अफगाणिस्तानचा धुव्वा/८

# सीएमपदावरून ‘मविआ’त कलगीतुरा

## काँग्रेस, राष्ट्रवादीने संजय राऊतांना सुनावले







**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात सर्वांचे लक्ष विधानसभा निवडणुकीकडे आहे. कोण किती जागा लढवणार यावर चर्चा सुरू असताना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी थेट मुख्यमंत्रिपदासाठी उद्धव ठाकरे यांचे नाव रेटले आहे. यानंतर महाविकास आघाडीतील वातावरण तापू लागले आहे.

खासदार राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, राज्यात विधानसभा निवडणूक लढताना महाविकास आघाडीला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा हा द्यावाच लागणार आहे. सर्वाधिक जागा जास्त त्यांचा मुख्यमंत्री असं कोण म्हणतं? राज्याने उद्धव ठाकरे यांचे मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले असून लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला जे यश मिळाले ते उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री म्हणून केलेल्या नेतृत्वाचा परिणाम आहे. लोकसभा निवडणुकीत तिन्ही पक्षांची ताकद एकत्र होती. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा नसेल तर बिनचेहऱ्याची निवडणूक लढता येणार नाही. किंबहुना लोक ते स्वीकारणारदेखील नाहीत असे म्हणत राऊत यांनी अप्रत्यक्षरित्या उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित करण्याची मागणी केली आहे.

महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्रिपदासाठी आताच महाविकास आघाडीतील कुठल्याही नेत्यांनी स्वारस्य दाखवू नये. निवडून आलेले आमदार त्या वेळी मुख्यमंत्रिपदाचा निर्णय घेतील. त्यावर आताच भाष्य करणे टाळले पाहिजे, अशा शब्दांत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राऊत यांचे कान टोचले आहेत.

काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी, सध्या आम्ही महाविकास आघाडी म्हणूनच एकत्र लढणार आहोत. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा हा निवडणुकीनंतर आणि निकालानंतर ठरेल, असे स्पष्ट केले.

### शिवसेनेचा टोला


राऊत यांच्या मुख्यमंत्री पदाबाबतच्या विधानावर महायुतीचे नेते संजय शिरसाट यांनी चिमटा काढला. उद्धव ठाकरे यांना राऊतांनी पंतप्रधानपदाचे उमेदवार जाहीर केल्याची आठवण त्यांनी करून दिली. पक्षाचा नेता म्हणून त्यांनी केलेली मागणी हे त्याच्यापुरती सीमित आहे. शरद पवार असतील किंवा इतर काँग्रेसचे नेते असतील हे कधी मान्य करतील असे मला वाटत नाही. त्यामुळे राऊत हे काडी लावत असल्याचा टोला त्यांनी हाणला.



**मुंबई : राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन गुरुवारपासून मुंबईत सुरू झाले असून विधानभवनात प्रवेश करताना राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आणि पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांचे टिपलेले छायाचित्र.**

# महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल सादर

## ■ अर्थव्यवस्थेत ७.६ टक्क्यांची वाढ अपेक्षित



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या विधानसभेचे पावसाळी अधिवेशन गुरुवार (दि. २७)पासून सुरू झाले. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आर्थिक वर्ष २०२३-२४चा राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवला. या अहवालानुसार महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ७.६ टक्क्यांनी वाढेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे, तर कृषी व कृषीपूरक क्षेत्रातही १.९ टक्क्यांची वाढ अपेक्षित आहे.

या आर्थिक वर्षात राज्याच्या आर्थिक विकासात सेवा क्षेत्राचा सर्वात मोठा (६३.८ टक्के) वाटा असून त्या खालोखाल उद्योग (२५ टक्के) क्षेत्राचा नंबर लागतो. कृषी व संलग्न कार्यांमध्ये ११.२ टक्के वाढीची शक्यता आहे.

२०२३-२४चे राज्याचे उत्पन्न ४०.४४ लाख कोटी रुपये असून त्यामध्ये आर्थिक वर्ष २०२२-२३च्या तुलनेत १०.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. २०२३-२४मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न २,७७,६०३ रुपये इतके अपेक्षित असून २०२२-२३मध्ये ते २,५२,३८९ रुपये इतके होते, असे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

# ‘मुलींच्या फी माफीचा शासन आदेश लवकरच’

**कोल्हापूर :** मुलींच्या व्यावसायिक शिक्षणाच्या फी माफीबद्दलचा शासन आदेश पदवीधर निवडणुकीच्या आचारसंहितेनंतर निघेल, असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले आहे. ते गुरुवारी (दि. २७) कोल्हापूर येथे पत्रकारांशी बोलत होते.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघाच्या आढाव्यासाठी मंत्री पाटील कोल्हापुरात आले आहेत. ते म्हणाले, मुलींच्या व्यावसायिक फी माफीचा निर्णय शासनाने घेतला आहे, परंतु कोकण पदवीधर निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे शासन आदेश निघू शकला नाही. तसेही या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना अजूनही महिना आहे. त्याआधीच शासन आदेश निघेल.

# उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीसांचा एकाच लिफ्टने प्रवास

## प्रवीण दरेकरांनी सांगितली इनसाईड स्टोरी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनच्या गुरुवारी (दि. २७) पहिल्या दिवशी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लिफ्टमध्ये जाताना योगायोगाने भेट झाली. या वेळी दोन्ही नेत्यांमध्ये जुजबी संवाद झाला. भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी या भेटीची कहाणी प्रसारमाध्यमांना सांगितली.

अधिवेशनासाठी देवेंद्र फडणवीस आणि इतर काही नेते सभागृहात जाण्यासाठी लिफ्टच्या बाहेर उभे होते. त्या



वेळी लिफ्टजवळ माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मिलिंद नार्वेकर आले. यानंतर काही क्षणात लिफ्ट आली. लिफ्टमध्ये मंत्री छगन भुजबळ, आमदार प्रवीण दरेकर, प्रसाद लाड होते. दरवाजा उघडताच काही जण बाहेर आले आणि त्यांनी फडणवीस आणि ठाकरेंना जागा करून दिली.

यानंतर उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस आणि इतर काही नेते एका लिफ्टमधून सभागृहात दाखल झाले. याबद्दल माहिती देताना दरेकर यांनी सांगितले की, लिफ्टबाहेर दोन्ही नेत्यांचा अडीच मिनिटे एकमेकांशी संवाद साधला. त्या वेळी कोणीतरी तुम्ही एकत्रित आहात हे पाहून बरे वाटते असे म्हटले, तर उद्धव ठाकरे यांनी माझ्याकडे बोट दाखवून याला आधी बाहेर काढा, असे मस्करीत म्हणाले. त्यावर माझी बाहेर जायची तयारी आहे. तुम्ही होता का एकत्र? असे हसत हसत उत्तर दिले. मग लिफ्ट वर गेली. तळ मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर असा ३० सेकंदाचा प्रवास झाला.

आम्ही लिफ्टमधून बाहेर आल्यानंतर ते विरोधी आणि आम्ही सत्तेच्या दिशेला गेलो. त्यांची मानसिकता विरोधी पक्षात राहण्याची आहे. सत्तेच्या दिशेला ते आले नाहीत. आमचे दोन वेगळे मार्ग दिसून आले, असेही दरकेर म्हणाले.

## निवडक

### ‘नीट’ परीक्षा पेपरफुटीप्रकरणी बिहारमधून दोघांना अटक

**पाटणा :** वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता घेण्यात आलेल्या ‘नीट’ सामाईक प्रवेश परीक्षा पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने बिहारच्या पाटणामधून गुरुवारी (दि. २७) दोघांना अटक केली. मनीष प्रकाशने आशुतोष कुमारच्या विनंतीवरून एका स्कूलशी संबधित वसतिगृहात काही विद्यार्थ्यांना नीट परीक्षेचे लीक झालेले पेपर व उत्तरपत्रिका दिल्याचा संशय आहे. अधिक तपास सुरू आहे.

### अकरावीच्या प्रवेशांसाठीची पहिली गुणवत्ता यादी जाहीर

**मुंबई :** अकरावीच्या प्रवेशांसाठीची पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाली आहे. पात्र विद्यार्थ्यांना उपलब्ध महाविद्यालयांत १ जुलैपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. उमेदवारांना नाव ज्या कॉलेजसाठी पात्र आहे तिथे नावनोंदणी करावी लागेल. जर प्रवेश घ्यायचा नसेल तर हे विद्यार्थी पुढील फेरीची वाट पाहू शकतात, पण एखादा विद्यार्थी पहिल्याच कॉलेजमध्ये पात्र ठरल्यास त्याला तिथे अ‍ॅडमिशन घेणे अनिवार्य असेल; अन्यथा तिन्ही याद्या जाहीर झाल्यावर प्रवेश घेता येईल.

# बीसीटी लॉ कॉलेजला ‘नॅक’चे मानांकन

## बी+ श्रेणी प्राप्त; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल खांदा कॉलनीतील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषद (नॅक) बंगळुरूकडून बी+ श्रेणी आणि २.६९ सीजीपीएसह मानांकन प्राप्त करून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

नॅक तपासणी पथकाने नुकतीच महाविद्यालयाला भेट दिली. या समितीमध्ये अध्यक्ष प्रा. अशोक पाटील (कुलगुरू, नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ स्टडी अ‍ॅण्ड रिसर्च इन लॉ, रांची), समन्वयक प्रा. सुधांशु रंजन मोहोपात्रा (प्राध्यापक, विधी विभाग, गुरू घासीदास विश्वविद्यालय, छत्तीसगड) आणि सदस्य डॉ. रजनी धिंग्रा (प्राचार्य, महाराजा अग्रसेन व्यवस्थापन संस्था, पश्चिम दिल्ली) यांचा समावेश होता.

नॅक तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या प्रत्येक विभागाला अर्थात प्रशासकीय कार्यालय, ग्रंथालय, परीक्षा कार्यालय, मूट कोर्ट, डीएलएलई कार्यालय, विधी सहाय्य केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना विभाग येथे भेट देत संबंधित विभागप्रमुखांशी संवाद साधला आणि महाविद्यालयाच्या कार्यप्रणालीवर अहवाल तयार केला, जो नॅक पोर्टलवर अपलोड करण्यात आला.

नॅक समिती सात निकषांच्या आधारे उच्च शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन आणि मान्यता प्रदान करते. **(पान २ वर..)**

# कोकण पदवीधर निवडणुकीत एक लाख ४३ हजार मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण ६४.१४ टक्के मतदान झाले. कोकण विभागात एक लाख २७,७६९ पुरुष आणि ९५,६३९ महिला असे एकूण दोन लाख २३,४०८ मतदार आहेत. त्यापैकी ८४,६६५ पुरुष आणि ५८,६३२ स्त्री अशा एकूण एक लाख ४३ हजार २९७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

मुंबई पदवीधर मतदारसंघात ७१ हजार १० पुरुष आणि ४९ हजार ७६१ महिला असे एकूण एक लाख २० हजार ७७१ मतदार आहेत. त्यापैकी ८४ हजार ६६५ पुरुष आणि २६ हजार ६०२ स्त्री अशा एकूण ७६ हजार ६४६ मतदारांनी मतदान केले.

मुंबई शिक्षक मतदारसंघात तीन हजार ९५३ पुरुष आणि ११ हजार ८८६ महिला असे एकूण १५ हजार ८३९ मतदार आहेत. त्यापैकी तीन हजार १३० पुरुष आणि आठ हजार ८७२ महिला अशा एकूण १२ हजार दोन मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघात ठाणे ५८.४२, पालघर ६३.२३, रायगड ६७.५९, रत्नागिरी ६९.१४, सिंधुदुर्ग ७९.८४ असे एकूण ६४.१४ टक्के मतदानाची नोंद झाली. मुंबई पदवीधर मतदारसंघात ५६.०१ टक्के, तर मुंबई शिक्षक मतदारसंघात ७५.७७ टक्के मतदान झाले.

या निवडणुकीची मतमोजणी १ जुलै रोजी नवी मुंबईतील नेरूळ (पश्चिम) सेक्टर २४ येथील आगरी कोळी संस्कृती भवनात होणार आहे.

# पनवेलच्या आकुर्लीत घंटागाडीचे लोकार्पण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आकुर्ली ग्रामपंचायतीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा परिषद शेष फंडातून उपलब्ध करून देण्यात आलेल्या घंटागाडीचे लोकार्पण भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २७) झाले. या वेळी त्यांच्या हस्ते वृक्षारोपणदेखील करण्यात आले.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील आकुर्ली ग्रामपंचायतीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा परिषद शेष फंडातून घंडागाडी उपलब्ध करून देण्यात आली असून या गाडीचा लोकार्पण सोहळा गुरुवारी आयोजित करण्यात आला होता. त्यानुसार या घंटागाडीचे लोकार्पण भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. त्याचप्रमाणे माजी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, उपसरपंच भारती सचिन पाटील, उपसरपंच नितीन धरणेकर, सदस्य मच्छिंद्र पाटील, उमेश भोपी तसेच दीपक पाटील, जयेंद्र पाटील, दीपक म्हात्रे, जयेंद्र नाईक, संदीप पाटील, सचिन पाटील, सुनील पाटील, विश्वजीत पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# एक्स्प्रेस वेवर अपघात; एक ठार, पाच जण जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर कारचा भीषण अपघात होऊन एकाचा मृत्यू, तर पाच जण जखमी झाल्याची घटना बुधवारी (दि.२६) सायंकाळी ७.३०च्या. सुमारास घडली. यात एकाचा मृत्यू, तर पाच जण जखमी झाले आहेत.

कल्याणमधील भाविक कार्ला येथील एकविरा देवीचे दर्शन घेऊन घरी परतत असताना त्यांची एर्टिगा कार खोपोली हद्दीत डिव्हायडवर धडकून हा अपघात झाला. या अपघातात लहू कारभारी यांचा जागीच मृत्यू झाला, तर पाच जखमी झाले आहेत. जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**(अधिक वृत्त पान २ वर..)**



# कोकणातील गणेशभक्तांचा प्रवास होणार सुऽऽसाट!

## कशेडीतील दुसरा बोगदा ऑगस्टअखेर खुला करण्याचा मानस

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. कशेडी बोगद्यातून आता प्रवास सुखकर होणार आहे. कोकणात जाणाऱ्या लेनवरील बोगदा ऑगस्टअखेरीस वाहतुकीसाठी खुला होणार आहे. त्यामुळे प्रवाशांना आता विनाअडथळा प्रवास करता येणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात हजारो चाकरमानी कोकणात जातात. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. आता कशेडी घाटातील या बोगद्यामुळे प्रवास सुखकर होणार आहे.



मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी येथील कोकणात जाणाऱ्या लेनवरील बोगदा ऑगस्टअखेर वाहतुकीसाठी खुला होणार आहे. त्यामुळे या बोगद्यातून चाकरमान्यांना प्रवास करता येणार आहे. महामार्गावर कशेडी बोगद्यात ये-जा करण्यासाठी दोन स्वतंत्र बोगदे तयार करण्यात आले आहेत. एक बोगदा सध्या वाहतुकीसाठी सुरू असून दुसरा ऑगस्ट अखेरपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचा राष्ट्रीय महामार्ग विभागाचा मानस आहे.

काही दिवसांपूर्वी कशेडी घाटातील बोगद्याला गळती लागल्याची चर्चा होती. ही गळती थांबवण्यासाठी महामार्ग विभागाने युद्धपातळीवर प्रयत्न केले गेले. त्यासाठी आयआयटीच्या तज्ज्ञांची मदत घेतली जात होती. त्यांच्या माध्यमातून पाहणी करून गळतीच्या कारणांचा शोध घेतला जात आहे. सध्या ग्राऊडींग करून गळती थांबवण्यात आली.

मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटाला पर्याय म्हणून कशेडी बोगद्याची निर्मिती केली आहे. त्यामुळे पोलादपूर ते खेड हे अंतर अवघ्या २० मिनिटांत पूर्ण करणे शक्य झाले आहे. कशेडी बोगद्यामुळे तळ कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. या बोगद्यामुळे कोकणात पोहचणे सोयीचे होणार आहे.

> **कोकणातून मुंबईकडे जाणारा बोगदा सध्या दुहेरी वाहतुकीसाठी वापरला जात आहे. कोकणात जाणाऱ्या बोगद्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. काही कामे शिल्लक आहेत. ती पूर्ण करून बोगदा ऑगस्ट महिन्यात सुरू केला जाईल.**
> **-संतोष शेलार, मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग**

# मुंबईत तयार होणार आता तिसरा सी-लिंक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईकरांना आता लवकरच आणखी एक सागरी सेतू मिळणार आहे. कुलाबा ते नरीमन पॉईंट सागरी सेतूचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विधानसभा अध्यक्षांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. सी-लिंकमुळे कुलाब्यातील वाहतूक कोंडी फोडण्यास मदत होणार आहे

दक्षिणेकडे जाण्यासाठी मार्ग मोकळा होणार आहे तसेच कोळी बांधवांना त्रास होऊ नये यासाठी नवीन मार्ग तयार करण्यात येणार आहे. यापूर्वी नरीमन पॉईंट ते कफ परेडपर्यंत असा पुलाचा मार्ग होता, मात्र या पुलाचा मार्ग रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे समुद्राच्या मधून जाणारा पूल आता किनाऱ्यावरून जाणार आहे.

नरीमन पॉईंट येथील एनसीपीए किनाऱ्याला लागून पार्कमार्गे जाणारा रस्ता तयार केला जाणार आहे. या रस्त्याला लागून मत्स्यालय विकसित केले जाईल. यामुळे पर्यटनासाठी चालना मिळून मुंबईकरांसाठी मनोरंजनाची नवी संधीही उपलब्ध होणार आहे.

**चार लेनचा पूल साकारणार**

नरीमन पॉईंटच्या एनसीपीएपासून सुरू होणार पूल कुलाबा फायर स्टेशनपर्यंत असणार आहे. पुलाला चार लेन असणार आहेत. दोन लेन नरीमन पॉईंट आणि दोन लेन कुलाबाकडे जाणाऱ्या वाहनांसाठी आहेत. मुंबईतील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी हा पूल महत्त्वाचा आहे. त्यामुळेच सरकार आता तिसरा सी-लिंक उभारण्याच्या प्रकल्पावर काम करीत आहे.




# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर कारचा अपघात

## एकाचा मृत्यू, पाच जण गंभीर जखमी



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर मुंबई लेनवर किमी ४३.४०० येथे कारचा भीषण अपघात होऊन एकाचा मृत्यू, तर पाच जण जखमी झाल्याची घटना बुधवारी (दि.२६) सायंकाळी ७.३०वा. सुमारास घडली. कारमधील सर्व प्रवासी कल्याणमधील आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार कल्याणमधील भाविक कार्ला येथील एकविरा देवीचे दर्शन करून घरी जात होते. त्यांची एर्टिगा कार खोपोली हद्दीत आली असताना चालक जयदेव चौधरी यांचे कारवरील नियंत्रण सुटून कार डिव्हायडवर धडकून गंभीर अपघात झाला. या अपघातात लहू कारभारी (रा. कल्याण, ठाणे) यांचा जागीच मृत्यू झाला तर, चालक जयदेश चौधरी (वय ३९), संतोष भोईर (वय ५५), दिनकर बापू पाटील (वय ६८), नरेश जाधव व मदन कारभारी (सर्व रा. कल्याण) हे जखमी झाले आहेत. सर्व जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालय दाखल करण्यात आले आहे.

अपघाताची माहिती मिळताच बोरघाट वाहतूक पोलीस यंत्रणा, आयआरबी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य सेवा आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी मदतकार्य केले.

दरम्यान, अपघात खोपोली पोलीस ठाणे हद्दीत झाला असल्याने तेथील पोलीस अपघाताची अधिक चौकशी करीत आहेत.

# नेरे हायस्कूलला वॉटर कुलर भेट

**नवी मुंबई** : दुर्गा फाउंडेशनच्या वतीने पनवेल तालुक्यातील विहिघर नेरे येथील नेरे हायस्कूलला वॉटर कुलर भेट दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ व थंड पाणी पिण्यास मिळणार आहे.

नवी मुंबईतील दुर्गा फाउंडेशन हे सातत्याने सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. त्यात शैक्षणिक क्षेत्रात संस्थेचे उल्लेखनीय कार्य आहे. संस्थेच्या अध्यक्ष शोभा भोईर यांच्याकडे शाळेत वॉटर कुलर हवा असल्याची माहिती मिळाली होती. भोईर यांनी याबाबत माहिती घेत तातडीने भेट देऊन माहिती घेत वॉटर कुलर बसवण्यात आला.

# पनवेल मनपाची प्लास्टिकविरोधात मोठी कारवाई

## एक टन सिंगल युज पिशव्यांचा साठा जप्त; ५५ हजारांचा दंड वसूल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार पनवेल महापालिकेच्या पनवेल, कामोठा, कळंबोली, खारघर या चारही प्रभागांमध्ये गुरुवारी (दि.२७) प्लास्टिकविरोधी मोठी कारवाई करण्यात आली. यामध्ये एक टन सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला तसेच सुमारे ५५ हजाराचा दंड वसूल करण्यात आला.



खारघर प्रभाग समिती 'अ' मध्ये प्लास्टिक पिशवी (सिंगल युज) बंदी कारवाई दरम्यान १० हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला. या कारवाईमध्ये सुमारे ६४० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. या ठिकाणी आरोग्य निरीक्षक जितेंद्र मढवी, स्वच्छता निरीक्षक अतुल मोहोकर, संदीप भोईर, अजय ठाकुर, अतिक्रमण विभाग व स्वच्छता दूत उपस्थित होते.

पनवेल महापालिकेच्या प्रभाग समिती 'ब' मधील प्रभाग क्रमांक ८मध्ये सिंगल न्यूज प्लास्टिकची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. या कारवाईमध्ये सुमारे ९५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आला आहे. त्यांच्याकडून दंडात्मक रक्कम १५ हजार रुपये वसूल करण्यात आली. या दंडात्मक कारवाईवेळी आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे प्रभाग क्रमांक ८चे स्वच्छता निरीक्षक अमोल कांबळे, हरेश कांबळे, अमित जाधव दिग्नेश भोईर उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' कामोठे व 'ड' पनवेलमध्ये प्लास्टिक पिशवी (सिंगल युझ) बंदी कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान अंदाजे २६५ किलो प्लास्टिक जप्त करून ३० हजार रुपये दंड शुल्क आकरण्यात आला. या कारवाईवेळी मुख्यआरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, स्वच्छता निरीक्षक योगेश कस्तुरे, ऋषिकेश गायकवाड, अतुल वास्कर, महेंद्र भोईर, धनश्री पीवाल व कर्मचारी उपस्थित होते.

# पनवेल येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग यांच्यामार्फत जिल्ह्यातील महिला व युवांकरिता १२ जुलै रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

याकरिता या विभागाचे संकेतस्थळावर https://rojgar.mahaswayam.gov.in नोंदणी केलेल्या आस्थापनांनी प्रथम आपल्याकडे हवे असलेले कुशल/अकुशल मनुष्यबळाची माहिती भरावी. ही माहिती भरताना प्रथम उपरोक्त संकेतस्थळावर Employment-Employer (List a Job)-Employer Login या क्रमाने जाऊन आपल्या आस्थापनेचा युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपल्या आस्थापनेची माहिती पहावी. त्यातील PanditDindayalUpadhyay Job Fair या ऑप्शनमधून दिसणाऱ्या रोजगार मेळाव्यांच्या यादीतील आपल्या जिल्ह्याच्या नावावरील View Details-Job Details--gree and Post Vacancy-Add New Vacancy ऑप्शनवर क्लीक केल्यानंतर रिक्तपदांची माहिती भरुन शेवटच्या पानावरील Save Vacancy वर क्लीक करावे. त्याचप्रमाणे ज्या आस्थापनांची यापूर्वी उपरोक्त संकेतस्थळावर नोंदणी करण्यात आलेली नाही त्यांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर Employment-Employer (List a Job)-Register या क्रमाने जाऊन नवीन नोंदणी करावी व आपल्या आस्थापनेची नवीन नोंदणी केल्यानंतर आपल्याकडील रिक्तपदे अधिसूचित करुन संकेतस्थळावर ९ जुलैपर्यंत नोटीफाईड करावीत.

संकेतस्थळावर नवीन नोंदणी करणे व रिक्तपदे अधिसूचित करणे या संदर्भात आपणास काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी (०२१४१-२२२०२९) किंवा महेश वखरे यांच्याशी (९४२१६१३७५७) संपर्क साधावा.

# खोपोलीत सर्वपक्षीय सभेत अमोल जाधव यांना श्रद्धांजली



**खोपोली : प्रतिनिधी**

जीवनात वेगवेगळ्या प्रकारच्या संघर्षाला सामोरे जाण्याची मानसिकता तरुणांनी ठेवावी, ज्येष्ठांचे, जवळच्या मित्रांचे मार्गदर्शन घ्यावे, मात्र त्याला आत्महत्या पर्याय नाही, असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी खोपोली येथे केले.

शिवसेना युवा नेते, माजी नगरसेवक अमोल जाधव यांच्या निधनानिमित्त बुधवारी (दि.२६) सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते. हभप कृष्णा महाराज लांबे, दत्ताजी मसुरकर, सुनील पाटील, विजय पाटील, सूर्यकांत देशमुख, अश्विनी पाटील, किशोर पाटील, विनोद साबळे, जगदीश मरागजे, प्रवीण जाधव, जे.पी. पाटील आदींनी आपल्या श्रद्धांजली सभेत अमोल जाधव यांच्या आठवणींना उजाळा दिला. या सभेला अमोल जाधव यांचे कुटुंबीय, हभप कर्णूक महाराज व विविध पक्षांचे प्रमुख नेते, पदाधिकारी, तसेच शहरातील नागरिक उपस्थित होते.



**खोपोली : रोटरी क्लब ऑफ खोपोलीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या वर्षीचा उल्लेखनीय कार्याचा वर्मा पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार जयवंत माडपे यांना देण्यात आला. हा पुरस्कार आपल्या सहकुटुंब पत्रकार माडपे यांनी रोटरी क्लबच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्वीकारला.**

पान १ वरुन

## बीसीटी लॉ कॉलेजला 'नॅक'चे मानांकन

मूल्यमापन निकषांमध्ये अभ्यासक्रमाचे पैलू; अध्यापन-शिक्षण आणि मूल्यमापन; संशोधन, नवकल्पना आणि विस्तार; पायाभूत सुविधा आणि शिक्षण संसाधने; विद्यार्थी समर्थन आणि प्रगती; प्रशासन आणि व्यवस्थापन; मूल्ये आणि सर्वोत्तम पद्धती या संदर्भात तपासणी पथकाने कॉलेजच्या एकूण कामकाज व व्यवस्थापनाचे मूल्यांकन केले आणि २.६९च्या सीजीपीएसह बी+ श्रेणी प्रदान केली.

भेटीदरम्यान नॅक तपासणी पथकाने व्यवस्थापन सदस्य, शिक्षण कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांसोबत बैठक घेतली. तपासणी पथकाच्या सदस्यांनी कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी मूलभूत सुविधा पुरवल्याबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले. महाविद्यालयाने दिलेले उत्तम विधी शिक्षण पाहून पथक खूप प्रभावित झाले आणि रायगड जिल्ह्यातील सर्वोत्तम विधी महाविद्यालय म्हणून उल्लेख केला. निष्कर्षात तपासणी पथकाने महाविद्यालयाच्या भविष्यातील प्रगतीसाठी आणि विकासासाठी सूचना दिल्या. पथकाने दिलेल्या सूचनांच्या आधारे महाविद्यालयाने अतिरिक्त सुधारणा करण्यासाठी आणि पुढील नॅक प्रमाणन चक्रात उच्च श्रेणी मिळवण्यासाठी पदक्रम घेण्याच्या योजना केल्या.

नॅक मानांकन महाविद्यालयाच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी आणि निर्धारित गुणवत्ता मानकांचे पालन करण्यासाठी समर्पणाचे प्रतीक आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नेतृत्वाखाली भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाने हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. यासाठी चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे यांचे आदर्श नेतृत्व आणि शैक्षणिक प्रगतीबद्दलची निष्ठा यांना विशेष श्रेय आहे.

प्राचार्य सानवी देशमुख, आयक्युसी समन्वयक राघव शर्मा आणि भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाच्या संपूर्ण प्राध्यापक व कर्मचारीवर्गाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन परिषदने ठरवलेल्या निर्धारित निकषांचे पालन करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांनी समग्र शिक्षण आणि शैक्षणिक प्रगतीसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले या विषयी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था व पालकवर्गाने महाविद्यालयाचे भरभरून कौतुक केले.

# पनवेलमध्ये पाच हजार झाडे लावण्याचा संकल्प

**नवी मुंबई : बातमीदार**

वैदिक संस्कृती सेवा संस्था आणि त्यांची सहयोगी संस्था व आयएसआर फाउंडेशनतर्फे आंबा आणि पेरूच्या २०० फळझाडांची लागवड पनवेल येथे करण्यात आली, तर खारघर येथेदेखील शेकडो झाडे लावण्यात आली. येत्या १०० दिवसांत पाच हजार रोपांची लागवड करण्याचा संकल्प या संस्थेने सोडला असून पुढील काही दिवसांत ही रोपे लावण्यात येणार आहेत.

पनवेलसह खारघर गुरुद्वारा साहिबच्या मागे आणि बाजूला कडुनिंब, पीपळ, वड, आंबा, बदाम, जॅकफ्रूट आणि अशोकाची १०० झाडे लावण्यात आली. काही दिवसांत १५० झाडे लावण्यात येणार आहेत. पलावा शहरात १०० कडुलिंबाच्या झाडांचे वाटप करण्यात आले.

सेक्टर २मधील वेलफ्रेड शाळेच्या आवारात वैदिक संस्कृती सेवा संस्था आणि उलवे बंगाली वेल्फेअर ट्रस्ट यांच्या वतीने कडुनिंब, पिंपळ, बदाम, अशोक आणि गुलमोहर या ५० झाडांची लागवड करण्यात आली.



# राजीव साबळे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**


राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती व माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे यांचा वाढदिवस माणगाव येथे ७ जुलै रोजी विविध सामाजिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी कृष्णा गांधी, संस्था पदाधीकारी नरेंद्र गायकवाड व नितीन बामगुडे यांनी सहविचार सभेत बोलताना दिली.

या वाढदिवसाची पूर्वतयारी सोमवारी (दि.२४) संस्थेचे पदाधीकारी, शिक्षकवर्ग, ॲड. राजीव साबळे मित्रमंडळ व साबळे परिवाराच्या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यादिवशी सकाळी ॲड. राजीव साबळे यांचे पिताश्री लोकनेते तथा माजी आमदार स्व. अशोकदादा साबळे यांना आदरांजली वाहण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. द.ग.तटकरे महाविद्यालय येथे महारक्तदान शिबिर, नगरपंचायत हद्दीत ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

या सहविचार सभेला संस्थेचे सेक्रेटरी ॲड. राजीव साबळे, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, संस्थेचे संचालक नितीन बामगुडे, संचालक डॉ. आबासाहेब पाटणकर, यासिन परदेशी, सामाजिक कार्यकर्ते संजय साबळे, माजी उपसभापती सुभाष केकाणे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, उणेगावचे माजी सरपंच राजेंद्र शिर्के, व्यापारी असोसिएशन माणगावचे लक्ष्मन दळवी, सभापती शर्मिला सुर्वे, माजी नगरसेविका नंदिनी बामगुडे, नगरसेवक दिनेश रातवडकर, सिराज परदेशी, लोकनेते अशोकदादा साबळे प्रतिष्ठान माणगाव अध्यक्ष अरुण क्षीरसागर, प्राचार्य बी. खामकर, शिपूरकर व वाघरे शाळेच्या प्राचार्य मनीषा मोरे, सीबीएससी स्कूलच्या प्राचार्य निशिगंधा मयेकर आदींसह पदाधिकारी, सभासद, उपस्थित होते.

## दुखवटा — कल्पना देसाई

**माणगाव** : तालुका पत्रकार संघाचे सचिव सचिन देसाई व सामाजिक कार्यकर्ते संदेश देसाई यांच्या मातोश्री कल्पना शरद देसाई यांचे गुरुवारी (दि.२७) पहाटे ३:१५ वा. निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८२ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. कल्पना देसाई यांचा दशक्रिया विधी ६ जुलै रोजी तर उत्तरकार्य विधी ८ जुलै रोजी राहते घरी होणार असल्याचे त्यांचे सुपुत्र सचिन देसाई यांनी सांगितले.



## निवडक

### ट्रेलरला स्कूटीची धडक; तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** जेएनपीटी ते पळस्पे रोडवरील गव्हाण फाट्याकडून सीबीडीकडे जाणाऱ्या रोडवर उभ्या असलेल्या ट्रेलरला स्कुटीची मागून धडक सल्याने झालेल्या अपघातात तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ट्रेलरचालक संजयकुमार सिंग (वय ३७) याने रस्त्यावर ट्रेलर थांविल्याने जयेंद्र पवार (वय १९) हा मागून स्कुटीवरून चालला असताना ट्रेलरला धडकल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** शहर परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ६० ते ६५ वर्षे आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२३३३ किंवा पो.उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रेल्वे स्टेशन परिसरात मृतदेह

**पनवेल :** रेल्वे स्टेशन चौकीसमोरील सर्कल या ठिकाणी एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ६५ ते ७० वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे साडेपाच फुट, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस वाढलेले, दाढी बारीक वाढलेली व मिशी वाढलेली असून कपाळ मोठे, नाक सरळ, डोक्याच्या डाव्या बाजूस जुनी जखमेची खुण आहे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा सहा.पो.निरीक्षक सुषमा पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### तरुणाचा मृतदेह आढळला

**पनवेल :** शहरात एका तरुणाचा मृतदेह आढळला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. अनोळखी तरूणाचे अंदाजे वय २५ ते ३० वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फुट, अंगाने सडपातळ, डोक्याचे व दाढीचे काळे व वाढलेले असून अंगात काळ्या रंगाचा टी-शर्ट व उजव्या हातावर इतर भाषेतील तीन अक्षरे गोंदलेली आहेत. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहाय्यक निरीक्षक प्रकाश पवार यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पावसाचा जोर वाढला

**पनवेल :** मागील बऱ्याच दिवसांपासून गायब झालेला पाऊस आता बऱ्यापैकी सक्रिय झाला आहे. गुरुवार (दि. २७)पासून त्याचा जोर वाढल्याने बळीराजा सुखावला आहे. त्याने शेतीच्या कामांनाही सुरुवात केली आहे.

# कळंबोली स्टील मार्केट परिसरात अवैध पार्किंग

## वाहतूक पोलिसांकडून अवजड वाहनांच्या चालकांना सूचना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आशिया खंडातील सर्वांत मोठे स्टील मार्केट म्हणून कळंबोली स्टील मार्केटची ओळख आहे, मात्र याच परिसरात होत असलेल्या अवजड वाहनांच्या अवैध पार्किंगमुळे मोठी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते.

या अनुषंगाने मंगळवारी (दि.२५) नवी मुंबई वाहतुक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या आदेशानुसार कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग साठे यांनी बीमा कॉम्प्लेक्स, स्टील मार्केट येथे स्टील मार्केटमधील



ट्रक, कंटेनर, ट्रेलर, मिक्सर आदी अवजड वाहनचालकांची बैठक घेतली. या वेळी स्टील मार्केटमधील पार्किंगच्या गंभीर समस्येबाबत वाहनचालकांना सूचना देण्यात आल्या.

तळोजा, मुंब्रा, शीळफाटा, कल्याण, भिवंडी, बदलापूर परिसरात जाण्यासाठी पनवेलहून कळंबोली सर्कल येथून जाणे सोयीचे ठरते. कळंबोली सर्कल येथील वाहतूक कोंडीतून वाट काढण्यासाठी वाहनचालक स्टील मार्केटमधील सर्विस रोडचा मार्ग अवलंबतात, मात्र स्टील मार्केटमधील रस्त्यावर होणाऱ्या दुहेरी, तिहेरी अवैध पार्किंगमुळे वाहनचालकांच्या मोठ्या रांगा लागतात आणि परिणामी कळंबोली सर्कलच्या वाहतूक कोंडीवर आणखीनच भर पडते.

या धर्तीवर वाहन पार्किंग करताना एकेरी पार्किंग व्यतिरिक्त कोणीही स्टील मार्केटमधील सर्विस रोड व इतरत्र रोडवर कुठेही आपली वाहने दुहेरी अथवा तिहेरी पार्किंग करणार नाहीत याबाबत कळंबोली वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना सक्त ताकीद दिली. असे करताना कोणी आढळल्यास त्या वाहनांवर गंभीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. तसेच सर्व वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम तंतोतंत पाळण्याबाबत प्रबोधन करण्यात आले. या वेळी वाहनचालक उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ओरिएंटेशन प्रोग्राम



**खारघर : प्रतिनिधी**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात गुरुवारी (दि.२७) वाणिज्य विभाग, व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग व अकाउंट व फायनान्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी ओरिएंटेशनचे आयोजन केले होते.

या ओरिएंटेशनसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील तिन्ही शाखेतील द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना महाविद्यालयात घेतले जाणारे सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम तसेच विविध कोर्सेस, अभ्यासक्रम, प्लेसमेंट ड्राईव्ह, वेगवेगळ्या नामांकित संस्थांबरोबर असणारे सामंजस्य करार व त्यातून होणारे माहितीचे आदान-प्रदान याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

या ओरिएंटेशन प्रोग्रामचे आयोजन प्रा. डॉ. रीत थुले व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग प्रमुख, प्रा. विशाल देशमुख वाणिज्य विभाग प्रमुख, प्रा. प्रवर शर्मा अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख यांनी केले तसेच तिन्हीही विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## पनवेलमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नियोजन बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन बैठकीचे आयोजन उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्यालयात करण्यात आले. या वेळी पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, पनवेल शहरातील कुंभारवाड्यातील मूर्तिकार, सामाजिक कार्यकर्ते प्रल्हाद बोडके, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणाचे भान राखून गणेशोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने मागील वर्षीप्रमाणे यावर्षी ही पनवेल महापालिका अभिनव उपक्रम राविणार आहे. या उद्देशाने पनवेल शहरातील कुंभारवाड्यातील मूर्तीकारांना शाडूपासून गणेशमूर्ती तयार करण्याबाबत चर्चा करण्यात आली. कुंभारवाड्यातील मुर्तीकारांनी शाडूपासून मुर्ती करण्यासाठी पालिकेच्या वतीने त्यांना शाडूची माती पुरविली जाणार आहे. या दृष्टीने त्यांची मातीची मागणी लिहून घेण्यात आली. मागणीनुसार माती मूर्तिकारांना घरपोच करण्यात येईल तसेच शाडूपासून बनविलेल्या मूर्ती विक्री करण्यासाठी मोठ्या सोसायट्यांमध्ये जागा उपलब्ध करण्याबाबत या वेळी चर्चा करण्यात आली.

### शाळांनाही सहभागी करणार

शाळेतील विद्यार्थी हे भावी नागरिक आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उपक्रमामध्ये शालेय विद्यार्थ्यांनादेखील सहभागी करून घेण्यात येणार आहे. यासाठी मोठ्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शाडूपासून गणपती बनविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी कला शिक्षिकांना मुर्ती प्रशिक्षण देण्याबाबत या वेळी चर्चा करण्यात आली.

## पनवेलमधील विकासकामांचा आयुक्तांनी घेतला आढावा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्यावतीने सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा गुरुवारी (दि. २७) आयुक्त मंगेश चितळे यांनी मुख्यालयात घेतला.



या वेळी त्यांनी कंत्राटदारांना कामे लवकरात लवकर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जे कंत्राटदार कामात कुचराई करत आहेत, त्यांच्यावर सक्त कारवाई करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

या वेळी शहर अभियंता संजय जगताप, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, सर्व कनिष्ठ अभियंते, संबधित कंत्राटकर व सल्लागार, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महापालिकच्या वतीने महापालिका कार्यक्षेत्रात सध्या 'स्वराज्य' मुख्यालय, कळंबोली, कामोठे, खारघर येथील प्रभाग कार्यालये, आदई सर्कल येथील आंतरराष्ट्रीय क्रिकेट अकॅडमी, खारघर, काळुंद्रे, नवीन पनवेल येथील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, खारघर येथील 'महापौर' बंगला, महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागातील क्रॉंकीट रस्ते या सर्व विकासकामांची सर्व माहिती, सध्य स्थिती असा सविस्तर आढावा आयुक्तांनी घेतला.

महापालिका कार्यक्षेत्रात अमृत २.० योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांचाही आढावा आयुक्तांनी घेतला. या वेळी उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय जगताप, उपअभियंता विलास चव्हाण, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी महापालिका कार्यक्षेत्रातील पिसार्वे तलावाचे काम जुलै अखेर संपविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले तसेच वॉटर मिटरची कामे सप्टेंबर अखेरपर्यंत संपविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.



**उलवे नोड : सेक्टर १७मध्ये ग्रेसवेल या हॉस्पिटलच्या उद्घाटनानिमित्त आमदार भरत गोगावले आले होते. तत्पूर्वी त्यांचे माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत यांनी स्वागत केले. सोबत गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख.**

## सीकेटी महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

छत्रपती शाहू महाराज यांनी प्राथमिक शिक्षण, जाती निर्मूलन, न्याय, समता आदीं समाजाभिमुख काम केले व बहुजन समाजाचा उद्धार शिक्षणातूच शक्य आहे, असे सांगितले. त्यांच्या या योगदानाचे स्मरण व्हावे या हेतूने सदर कार्यक्रमाचे आयोजन केले.

प्रस्तुत कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस के पाटील यांनी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. या कार्यक्रमासमयी महाविद्यालयाचे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयांमध्ये २६ जून हा दिवस छत्रपती शाहू महाराजांचा जयंती दिवस म्हणून उत्साहाने साजरा करण्यात आला.

इयत्ता दहावीच्या वर्गाकडे सांस्कृतिक विभागाने हा कार्यक्रम सोपविला होता दहावीच्या वर्गाच्या वर्गशिक्षिका विशाखा गावंड यांनी विद्यार्थ्यांची नियोजन पूर्वक तयारी करून घेऊन अतिशय उत्साहाने शाहू महाराज जयंती विद्यालयात साजरी झाली.

दहावीतील विद्यार्थिनी चंदा माळी हिने शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य आपल्या भाषणातून विशद केले. त्यामध्ये तिने शाहू महाराज हे खरे लोकशाहीवादी आणि समाजसुधारक मानले जातात. त्यांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबविली व दलित व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली हे आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना पटवून दिले.

दहावीच्या वर्गाच्या वर्गशिक्षिका विशाखा गावंड यांनी आपल्या भाषणातून राजश्री शाहूंनी आपल्या संस्थानात कलावंतांना राजाश्रय दिला हे स्पष्ट करून २६ जून हा त्यांचा जन्मदिवस महाराष्ट्रात सामाजिक न्याय दिवस म्हणून पाळला जातो हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या वेळी विद्यालयाच्या उपशिक्षिका वेदांगी म्हात्रे, पल्लवी पवार, भारती कोळी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी अतिशय उत्कृष्ट कार्यक्रम साजरा केल्याबद्दल दहावीच्या वर्गाच्या वर्गशिक्षिका व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



## फुंडे हायस्कूलमध्ये छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवारी (दि. २६) राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य एम.जी.म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे, सांस्कृतिक विभाग प्रमुख एच. एन.पाटील, साधना पाटील यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

इयत्ता दहावी अ वर्गाच्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षिका श्रीम अस्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाची छान तयारी केली होती. संजीवनी मासाल, क्रिशल पाटील, किशोर शिंदे या विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची माहिती आपल्या भाषणातून सांगितली. ज्येष्ठ मराठी विषय तज्ज्ञ आर. जी. शेळके यांनीही शाहू महाराजांचे संपूर्ण जीवनकार्य सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी ठाकूर हिने केले.

दरम्यान, विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांचे महत्त्व समजावे या उद्देशाने फुंडे हायस्कूलमध्ये सर्व महापुरुषांच्या जयंती, पुण्यतिथी नित्यनियमाने होत असतात.

## 'रयत'चा रायगड विभाग अव्वल राहिला पाहिजे -लोकनेते रामशेठ ठाकूर



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचा रायगड विभाग अव्वल राहिला पाहिजे, असे प्रतिपादन संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाशी येथे बोलताना व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील मुख्यध्यापकांची सहविचार सभा नवी मुंबईतील वाशी येथील मॉर्डन स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. त्यांनी दहावी आणि बारावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या सभेस संस्थेचे रायगड विभागीय निरीक्षक आर.पी. ठाकूर, सहाय्यक निरीक्षक शहाजी फडतरे, मॉर्डन स्कूलच्या प्राचार्य सुमित्रा भोसले यांच्यासह पदाधिकारी, सदस्य, मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

सभेत विद्यालयाचे शैक्षणिक कामकाज कसे असावे, विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता कशी वाढविली गेली पाहिजे या विविध विषयांवर उपस्थित मान्यवरांनी मुख्याध्यापकांना मार्गदर्शन केले.



**पनवेल : न्हावाखाडी येथील जय हनुमान मंदिरात श्री समर्थ सदगुरूनाथ दादामहाराज यांचा पुण्यतिथी सप्ताह आयोजिण्यात आला होता. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट दिली. त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल. ठाकूर, अरुणशेठ ठाकूर आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# राजकीय पतंगबाजी!

गेल्या काही वर्षांत सत्ताधारी आणि विरोधकांमधल्या सौहार्दाची जनतेला सवयच उरलेली नाही. इरेला पेटून एकमेकांवर वाट्टेल तसे आरोप करणारी ही नेतेमंडळी व्यक्तिगत पातळीवर मात्र एकमेकांशी मैत्रभाव टिकवतात, हे जनतेसाठी आश्चर्यचकित करणारे झाले आहे. वैरभावाची हल्ली बातमी होत नाही, ते गृहितच धरले जाते, पण मित्रभावनेबद्दल मात्र आश्चर्य वाटते. हाच बदल सध्याच्या काळात झाला आहे. वास्तविक सत्ताधारी असोत किंवा विरोधक, परस्परांबद्दल व्यक्तिगत पातळीवर आदरभावच ठेवतात.

**महाराष्ट्रातील विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन गुरुवारपासून सुरू झाले. शिरस्त्याप्रमाणे सत्ताधाऱ्यांनी पूर्वसंध्येला आयोजित केलेल्या चहापानावर विरोधकांनी बहिष्कार टाकलाच होता. यावेळचे अधिवेशन वादळी ठरणार अशा बातम्या गेले काही दिवस येत होत्या. शेतकऱ्यांना साह्य, मराठा–ओबीसी आंदोलन किंवा निधीवाटपावरुन सरकारला घेरण्याची रणनीती महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून आखली जात असल्याचे कानावर येत होते. त्याप्रमाणे गुरुवारी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे विधिमंडळ सभागृहाच्या पायऱ्यांवर घोषणाही झाल्या, परंतु खुद्द सभागृहाच्या आसपास आणि दालनांमध्ये किंवा बाहेरच्या दीर्घिकांमधले वातावरण खेळीमेळीचे बघायला मिळाले. देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही माजी मुख्यमंत्री केवळ योगायोगाने सभागृहाच्या उद्वाहनाशी एकमेकांना भेटले. त्यांनी एकमेकांशी स्मितहास्य करीत आपला मजला गाठला व आपापल्या दालनांमध्ये रवाना झाले. भाजपचे नेते प्रवीण दरेकर, ठाकरे यांचे निकटचे सहकारी मिलिंद नार्वेकर तसेच अन्य काही नेते देखील यावेळी उपस्थित होते. या साऱ्यांनी एकत्रच लिफ्टमधून प्रवास केला. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात मात्र खमंग चर्चा सुरू झाल्या. मतभेदाकडून हे दोन्ही नेते मनोमिलनाच्या दिशेने निघाले आहेत का, अशा बातम्याही काही वृत्तवाहिन्यांनी चालवल्या. दुसरी घटना घडली, तिच्याकडेही पत्रकारबांधवांचे लक्ष वेधले गेले. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांनी उद्धव ठाकरे यांची समक्ष भेट घेऊन त्यांना चॉकलेट दिले. ठाकरे गटाचे नेते अनिल परब हे पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उभे आहेत. त्यांनाही त्यांनी शुभेच्छा दिल्या. हे सारे खेळीमेळीत, किंचितही कटुता नसलेल्या वातावरणात घडत होते. राजकारणातील हेवेदावे, टोकाची भांडणे हे एका विशिष्ट हेतूने चाललेले असते. त्यात वैयक्तिक काही असण्याचे कारणच नसते, पण गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील राजकीय वातावरण फार गढूळ होऊन गेले. ठाकरे गटाचे प्रवक्ते असोत किंवा आणखी काही तोंडाळ नेते असोत, त्यांच्यामुळे राजकीय वैर हे आजन्म बाळगले जावे अशी समजूत घट्ट झाली. या छोट्या घटनांमध्ये राजकारण शोधण्याचे काहीच कारण नाही. अशा भेटीगाठी होतच असतात. त्यात राजकीय चर्चा अपेक्षित नसते. भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनीही हीच बाब नंतर स्पष्ट केली तसेच खुद्द उद्धव ठाकरे यांनीही पत्रकार परिषदेत आपला विरोधी नेत्याचा पवित्रा कायम ठेवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मात्र 'काँग्रेसच्या लिफ्टमध्ये घुसल्याने त्यांची लिफ्ट अडकली, ती सहाव्या मजल्यापर्यंत कधी पोचणार नाही' असा सणसणीत टोमणा ठाकरे यांना लगावला. पावसाळी अधिवेशन हे विद्यमान सरकारच्या निरोपाचे ठरेल, असे भाकित ठाकरे यांनी केले आहे, पण तसे काही घडण्याची शक्यता दूरवर दिसत नाही. एकंदरित राजकारणातील भांडणे आणि खेळीमेळी या दोन्ही गोष्टी तात्कालिक असतात. त्यातून काही निराळे निष्कर्ष काढण्याची गरज नाही, हेच अधोरेखित झाले. अशा प्रकारची राजकीय पतंगबाजीही तात्कालिकच म्हटली पाहिजे.**

# रायगडात पावसाळी पर्यटनाला चालना द्यायला हवी





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा निळाशार समुद्रकिनारे, नारळी केळीच्या बागा असा निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. ऐतिहासिक स्थळे, धार्मिक स्थळे, गड–किल्ले आहेत. मोठ धबधबे आहेत. तलाव आहेत. त्यामुळे पावसाळ्यात पर्यटक मोठ्या प्रमाणात या जिल्ह्यात वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी येत असतात, परंतु काही अतिउत्साही पर्यटकांमुळे धबधब व तलावांच्या ठिकाणी अपघात घडतात. काही दिवसांपूर्वी खालापूर तालुक्यातील तलावात बुडून मुंबईतील चार तरुणांचा मृत्यू झाला. अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील तलावात बुडून दोन तरूणांचा मृत्यू झाला. मागील काही वर्षांमध्ये असे अपघात घडले आहेत. असे अपघात घडल्यामुळे दोन वर्षांपूर्वी धवधबे व तलावांच्या ठिकाणी पर्यटकांना जाण्यास बंदी घलण्यात आली होती. या वेळी जिल्हा प्रशासनाने तसे केले नाही. हे चांगले झाले. पर्यटकांना बंदी घातल्यामुळे तेथील लोकांचा व्यावसाय बोडतो तसेच ज्यांना खऱ्या अर्थाने वर्षासहलीचा आनंद लुटायचा असतो त्यांच्या आनंदावर विरजण पडते. हे टाळण्यासाठी अतिउत्साही पर्यटकांना आवरले पाहिजे. पर्यटकांनीदेखील स्वतः ला अवरले पाहिजे. अपघात होऊ नये याची खरबरदारी घेतली पाहिजे. प्रशासनाने पावसाळ्यात धबधब्यांवर जाण्यात पर्यटकांना बंदी घालण्याऐवजी या जिल्ह्यातील वर्षा पर्यटनाला चालना देण्यासाठी काही उपाययोजना केल्या पाहिजेत.

रायगड जिल्ह्यात मांडावा, किहीम, वरसोली, अलिबाग, आक्षी, नागाव, रेवदंडा, काशीद, मुरुड, दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर हे समुद्रकिनारे, आहेत. रायगड, कुलाबा, जंजिरा, कोर्लई, ताळा, सुधागड असे किल्ले आहेत, गांधारपाले, कुडा आदी लेण्या आहेत. पाली, महाड हे अष्टविनायकातील गणपती आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यात पर्यटकांची गर्दी असते.

रायगड जिल्ह्यात पावसाळी पर्यटनासाठीदेखील भरपूर स्थळ आहेत. वर्षा सहलीचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणवार पर्यटक येतात. जिल्ह्यातील काही धबधबे पर्यटकांना आकर्षित करतात. तेथे पावसाळ्यात दरवर्षी हजारो पर्यटक जाता, परंतु या ठिकाणी सहज पोहचता येत नाही. त्यामुळे अनेक लोक तेथे जात नाहीत. जे काही मोजके धबधबे आहेत जिथे पर्यटक गर्दी करतात तेथे पर्यटनाच्या दृष्टीने विकास केला पाहिजे. काही धबधब्याच्या ठिकाणी चांगल्या सुविधा दिल्या पाहिजेत. यातून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. रायगड जिल्ह्यातील ताम्हीणी घाट हे वर्षा सहलीसाठी पर्यटकांचे आवडते ठिकाण. ताम्हीणी घाटात छोटेमोठे अनेक धबधबे आहेत. या धबधब्यांवर जाण्यासाठी फार कष्ट घ्यावे लागत नाहीत. त्यामुळे वर्षा सहलीसाठी ताम्हीणी घाट पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे. श्रावण महिन्यात पर्यटक या धबधब्यांवर मोठ्या प्रमाणावर येतात. सुट्टीच्या दिवशी ताम्हीणी घाट पर्यटकांनी गजबजलेला असतो.

महाड तालुक्यातील मांडला, केंबुर्ली, शिवथरघळ, पोलादपूर तालुकयातील मोरझोत, रोहा तालुक्यातील सुकेळी खिंड, कर्जत तलुक्यातील आशाणी–कोशेणी, खांडस, झेनीथ, अलिबाग तालुक्यातील सिध्देश्वर, कुर्डूस, माणगाव तालुक्यातील देवकुंड हे धबधबे प्रसिध्द आहेत. रायगड जिल्ह्यात काही तलाव आहेत. जेथे पर्यटक पावसाळी सहलीसाठी जातात, परंतु काही अतिउत्साही पर्यटकांमुळे धबधबे व तलावांच्या ठिकाणी अपघात घडतात. हे अपघात पर्यटकांच्या अतिउत्साहामुळे घडत असतात.

मांडला, मोरझोत, आशाणी–काशेणी हे चांगले धबधबे आहेत. हे धबधबे पर्यटकांना आकर्षीत करतात. या धबधब्यांवर पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असताता, परंतु या ठिकाणी पर्यटकांना सहज पोहचता येत नाही. पर्यटकांना पोहचण्यासाठी रस्ते नाहीत. तसेच तेथे सुरक्षीतेसाठी उपययोजना नाहीत. मोरझोत धबधब्यापर्यत मोठी गाडी जाऊ शकते, परंतु तेथे पर्यटक प्रवाहपर्यंत जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. याठिकाणी पायवाट तयार करून तेथे सेल्फीपॉईंट तयार केल्यास अपघात टाळता येतील.

आलेला पर्यटक थांबला पहिजे. तरच पर्यटन व्यवसाय खऱ्या अर्थाने वाढेल. जर निवास व भोजनाची चांगली सुविधाच नसेल तर पर्यटक थंबणार नाही. त्यामुळे स्थानिक पर्यटन व्यावसायिकांना प्रोत्साहन द्यायला हवे. त्यांना काही सवलती दिल्या पाहिजे. पर्यटन व्यवसाय वाढला पाहिजे म्हणायचे आणि हा व्यावसाय करणाऱ्यांवर कारवाई करायची हे योग्य नाही. उलट पर्यटन व्यवसाय करणाऱ्यांना काही सवलती द्यायला हव्यात. केवळ भिंती बांधल्या आणि दिशादर्शक फलक लावले म्हणजे पर्यटन वाढेल अस नाही. पर्यटन व्यावसाय करणाऱ्यांनादेखील प्रोत्साहन द्यायला हवे.

बुधवारी (दि. २६) रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकरी कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत आढावा बैठकी झाली. यात जिल्ह्यातील गड किल्ले, समुद्रकिनारे, धबधबे यासह विविध ठिकाणी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी उपाय याजना करण्याबाबत चार्चा झाली. या वेळी जिल्हाधिकारी यांनी पर्यटनस्थळांवर पर्यटकांना जाण्यास बंदी घालण्याचे आदेश दिले नाहीत. तर पर्यटकांना स्थानिक गार्डसोबत नेणे बंधनकारक करावे. पर्यटकांना गड–किल्ले, धबधबा, धरणे, पाणी प्रकल्प, समुद्रकिनारी व इतर धोकादायक ठिकाणी सेल्फी घेण्यास प्रतिबंध करावे असे निर्देश दिले. हे चांगले झाले. धबधबे केवळ पावसाळ्यत असतात. या दिवसात पर्यटक तेथे आल्यामुळे त्या गावांमधील लोकांना हंगामी का होईना रोजगार मिळतो. बंदी घतल्यामुळे हा रोजगार बुडतो. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी जो निणर्य घेतला आहे त्याचे स्वागतच केले पहिजे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली धबधब्यात पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. संरक्षण कडे बांधण्यात आले आहेत. तशाच प्रकारचे संरक्षणकडे रायगड जिल्ह्यातील कही धबधब्यांजवळ बांधल्या अपघात टळू शकतात. रायगड जिल्ह्यातील काही प्रमुख धबधब्यांच्या ठिकाणी जर चांगल्या सुविधा उपलब्ध करू दिल्या तर पावसाळी पर्यटनास चालना मिळू शकते.



## बदलते तंत्रज्ञान

### सिम कार्डसंदर्भात मोठा निर्णय; १ जुलैपासून बदलणार नियम

सध्याच्या टेक्नॉलॉजीच्या काळात मोबाईल फोन न वापरणारे खूप कमी लोक आहेत. कोणी स्मार्टफोन वापरतं तर कोणी साधा किपॅडचा फोन वापरतं. बरेच जण एकाहून जास्त सिम कार्ड वापरतात. आता सिम कार्डसंदर्भात एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. TRAI ने युजर्सच्या सुरक्षेचा विचार करून नियमांमध्ये बदल केला आहे. आता पुन्हा एकदा सिमकार्डशी संबंधित नियम बदलणार आहेत. मोबाईल नंबर पोर्टेबिलिटी (MNP) नियमात बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सिम स्वॅप फ्रॉड टाळण्यासाठी ट्रायने हा नियम लागू केला आहे. हा नवीन नियम नेमका काय आहे आणि तो नियम का लागू करण्यात आला, तसेच सिम स्वॅपिंग हा काय प्रकार आहे ते जाणून घेऊयात...



**काय बदल झाला?**

सिम कार्ड चोरीला गेल्यास किंवा खराब झाल्यास तुम्हाला थोडा वेळ वाट पाहावी लागणार आहे. या पूर्वी सिमकार्ड चोरीला गेल्यावर किंवा खराब झाल्यानंतर तुम्हाला दुकानातून लगेच सिमकार्ड मिळायचं. पण आता त्याचा लॉकिंग पीरियड वाढवण्यात आला आहे. आता युजर्सना नवीन सिमसाठी सात दिवस वाट पाहावी लागेल, त्यानंतरच नवीन सिम कार्ड मिळेल. म्हणजेच पुढील सात दिवसांनंतरच तुम्हाला हे सिमकार्ड मिळेल. एमएनपी नियमांत बदल केल्यानंतर सात दिवस हा लॉकिंग पीरियड ठरवण्यात आला आहे.

**का घेण्यात आला निर्णय?**

हा निर्णय ट्रायने घेतला आहे. फ्रॉड आणि फसवणूक रोखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. अनेक प्रकरणांमध्ये असं दिसून आलं की एकदा सिमकार्ड चोरीला गेल्यानंतर तो नंबर दुसऱ्या सिमकार्डवर क्टिव्हेट केला गेला. यानंतर आणखी काही घटना घडवून आणल्या जातात. आता ऑनलाईन स्कॅमसारख्या घटना रोखण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. या बाबतचं नोटिफिकेशन ट्रायने मार्चमध्ये जारी केलं होतं.

**सिम स्वॅपिंग?**

सिम स्वॅपिंगचा अर्थ एकच नंबर दुसऱ्या कोणत्याही सिम कार्डवर क्टिव्हेट करणं असा होतो. आता सिम स्वॅपिंगची प्रकरणं वेगाने वाढत आहेत. एकाच सिम कार्डवर सेम नंबर मिळवण्याचे प्रकार वाढले आहेत. या गोष्टी टाळता याव्यात यासाठी सिम स्वॅपिंगची मुदत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

# गायक, संगीततज्ज्ञ पं. गजाननराव जोशी

प्रख्यात व्हायोलीनवादक व ग्वाल्हेर घराण्याचे नामवंत गायक पं. गजाननराव जोशी यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी माहिती...



**निमित्त**

गजाननबुवा जोशी यांचा जन्म गिरगाव, मुंबई येथे झाला. त्यांच्या आई इंदिराबाईंचे गजाननराव लहान असतानाच निधन झाले. त्यांचे वडील पं. अनंत मनोहर जोशी (अन्तुबुवा) यांना गायनाकरिता औंध संस्थानची शिष्यवृत्ती मिळाली होती. ते औंध संस्थानचे राजगायकही होते. अन्तुबुवा हे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य होते. गजाननरावांचे आजोबा मनोहरबुवा हेदेखील उत्तम गवई होते. अन्तुबुवांनी गिरगावला राहत्या घरी 'श्रीगुरुसमर्थ गायनवादन विद्यालय' सुरू केले होते. त्यामुळे लहानग्या गजाननरावांवर बालपणापासूनच संगीताचे संस्कार झाले. त्यांचे प्राथमिक शालेय शिक्षण झाले होते. पुढे गजाननरावांच्या वडिलांनी त्यांना घरीच गायनाचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. विनायकबुवा घांग्रेकर यांच्याकडून ते तबला शिकले. यथावकाश त्यांनी रामकृष्णबुवा वझे (ग्वाल्हेर घराणा) आणि प्रौढवयात उस्ताद भूर्जीखाँ (जयपूर घराणा), उस्ताद विलायत हुसेनखाँ (आग्रा घराणा) यांच्याकडेही गाण्याची तालीम घेतली.

गजाननरावांची लहानपणी वडिलांबरोबर धारवाड, बेळगाव, सांगली, औंध अशी अनेक ठिकाणी भ्रमंती झाली. औंधमध्ये त्यांच्या व्हायोलिनवादनास गती मिळाली. त्यानंतर ते घराबाहेर पडले व वयाच्या साधारण सोळाव्या वर्षापासून व्हायोलीनवादनाचे जाहीर कार्यक्रम करू लागले. त्यांना पुण्यामध्ये भारत गायन समाजात संगीतशिक्षकाची नोकरी मिळाली. १९२८पासून त्यांनी मुंबई आकाशवाणीवर गायन व व्हायोलिन वादनाचे कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. त्यावेळी एच.एम.व्ही. कंपनीने त्यांच्या व्हायोलीनवादनाची पहिली ध्वनिमुद्रिका काढली. ही खूप गाजली. १९३७मध्ये त्यांनी उत्तर हिंदुस्थानचा पहिला दौरा केला. या दौऱ्यामध्ये त्यांनी अनेक कार्यक्रम केले, यास श्रोत्यांचा खूप प्रतिसाद मिळाला. जयपूर घराण्याची गायकी शिकण्याच्या निमित्ताने कोल्हापूरातही काही वर्षे ते राहिले. पुढे दिल्ली आकाशवाणीवर त्यांनी सल्लागार म्हणून काम केले. या नोकरीमुळे त्यांची मुंबई, इंदूर, लखनऊ अशी अनेक ठिकाणी भ्रमंती झाली (१९५६–१९६८). गजाननबुवा मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागातही प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी अनेक संगीत परिषदांमधून भाग घेतला होता.

गजाननरावांनी उल्हास कशाळकर, पद्मा तळवलकर, अरुण कशाळकर, शुभदा पराडकर, जयश्री पाटणेकर, वीणा सहस्त्रबुद्धे यांना गायनाची तालीम दिली. तर श्रीधर पार्सेकर हे व्हायोलीनवादक त्यांचे शिष्य. त्यांची शिष्यपरंपरा त्यांच्या मुलांसोबतच पुढील पिढीनेही वाढविली आहे.

गजाननरावांच्या अध्यक्षतेखाली औंधमध्ये 'शिवानंद स्वामी संगीत प्रतिष्ठान' या संस्थेची स्थापना करण्यात आली (४ जानेवारी १९८१). गेली अनेक वर्षे ही संस्था संगीत शिक्षण शिबिरे, परिसंवाद, चर्चासत्रे, विविध कार्यशाळा घेऊन संगीताचा प्रचार व प्रसार करीत आहे. या संस्थेतर्फे दिवाळीच्या सुमारास होणारा औंध संगीत महोत्सव आपले वेगळे स्थान टिकवून आहे. महोत्सवामध्ये रियाझ या स्मरणिकेचे दरवर्षी प्रकाशन करण्यात येते. या संस्थेतर्फे अन्तुबुवा आणि गजाननराव यांच्या रचनांचे पुस्तक व ध्वनिमुद्रिका मालानिया गुंदे लावोरी २००८मध्ये प्रकाशित करण्यात आली.गजाननरावांचे डोंबिवली येथे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



पनवेल : अनेक दिवस दडी मारलेल्या पावसाने गुरुवारी पुनरागमन केले. या पावसामुळे नागरिक सुखावले आहेत.

## आरोग्य प्रहर

### चहाच्या घोटासह चुकूनही खाऊ नका 'हे' पदार्थ

चहाबरोबर काय खाऊ नये? अनेकदा आपल्याला चहा प्यायल्यावर अचानक करपट ढेकर येऊ लागतात, कधी ॲसिडिटी वाढते, या सगळ्याचं खापर चहावर फोडलं जात असलं तरी काही वेळा आपण चहाच्या जोडीला खाल्लेला बिस्कीटाचा पुडा, भज्या याच ॲसिडिटीचं कारण ठरू शकतात. आज आपण आहारतज्ज्ञ गौरी आनंद यांनी सांगितल्याप्रमाणे चहाचे सेवन करताना नेहमी टाळाव्या अशा सहा पदार्थांची यादी पाहणार आहोत.



**लिंबूवर्गीय फळे :** चहामध्ये लिंबाचा तुकडा घालणे फायदेशीर ठरू शकते, परंतु चहाच्या जोडीने मोठ्या प्रमाणात लिंबूवर्गीय फळांचे (संत्री, मोसंबी) सेवन केल्याने पचन समस्या उद्भवू शकतात. या फळांमध्ये जास्त आंबटपणा असल्यामुळे चहामधील टॅनिनसह ते छातीत जळजळ किंवा अपचन वाढवू शकतात.

**लोहयुक्त पदार्थ :** पालक, लाल मांस आणि शेंगा यासारख्या खाद्यपदार्थांमध्ये भरपूर लोह असते, जे तुमच्या शरीरासाठी आवश्यक असते. पण, चहामध्ये टॅनिन आणि ऑक्सलेट्स ही संयुगे असतात, जे नॉनहेम लोह (वनस्पती–आधारित पदार्थ आणि पूरक पदार्थांमध्ये आढळणारे लोहाचे प्रकार) शोषण्यास अडथळा निर्माण करू शकतात.

**मसालेदार पदार्थ :** चहाबरोबर मसालेदार पदार्थ खाल्ल्याने गॅस्ट्रोइंटेस्टाइनल त्रास वाढू शकतात. चहामधील टॅनिन पोटाच्या अस्तरांना त्रास देऊ शकतात आणि मसालेदार पदार्थांतील कॅप्सॅसिनसह मिसळल्यास पोटात आम्लता, अपचन आणि छातीत जळजळ होऊ शकते.

**अधिक कॅल्शियम असणारे पदार्थ :** विशिष्ट पालेभाज्या (उदा. केल, कोलार्ड, रव्या भाज्या) हे पदार्थ अधिक कॅल्शियमयुक्त असतात. हेच कॅल्शियम अँटिऑक्सिडंट्सना बांधायचे काम करते त्यामुळे कॅटेचिनसारख्या घटकांच्या शोषणात व्यत्यय येऊ शकतो.

**प्रक्रिया केलेल्या साखरेचे पदार्थ :** प्रक्रिया केलेल्या पदार्थांमुळे किंवा साखरेचे प्रमाण जास्त असलेल्या पदार्थांमुळे ग्लायसेमिक भार वाढतो परिणामी रक्तातील साखरेच्या पातळीत वाढ होऊ शकते. चहामध्ये सुद्धा साखर असते अशावेळी चहा आणि वर स्नॅक्समधील साखर असे प्रमाण जास्त झाल्यास मेटाबॉलिक सिंड्रोम आणि लठ्ठपणाचा धोका वाढू शकतो.

**थंड पदार्थ :** गरम चहाबरोबर थंड पदार्थ अजिबातच खाऊ नयेत. कारण विरोधाभासी तापमान पचनक्रियेत व्यत्यय आणू शकते. एकाच वेळी वेगवेगळ्या तापमानाचे अन्न खाल्ल्याने तुमची पचनक्रिया विस्कळीत होऊ शकते आणि मळमळ होऊ शकते. हे टाळण्यासाठी, दोन्हीच्या सेवनात किमान ३० मिनिटांचे अंतर ठेवा.

# पोलादपुरातील झुलता पूल ‘लटकला’

## पुनर्बांधणीसाठी विशेष निधी मिळावा; स्थानिकांची मागणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूरच्या वर्षापर्यटनाचे विशेष आकर्षण असलेला वाकण गोपाळवाडी ते घागरकोंड येथील झुलता पूल २०२१मध्ये अतिवृष्टीदरम्यान वाहून गेला. परिणामी वर्षापर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या पोलादपूर तालुक्यात गेल्या दोन वर्षांप्रमाणे यंदाही वर्षापर्यटनासाठी गर्दी होण्याची शक्यता घटली आहे. झुलत्या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी महायुती सरकारमध्ये असलेल्या ना. आदिती तटकरे आणि आमदार भरत गोगावले यांनी पुन्हा पर्यटन विशेष निधी उपलब्ध करून झुलत्या पुलाच्या लटकलेल्या प्रस्तावावर एकजुटीने प्रयत्न करण्याची गरज आहे.



पोलादपूर तालुक्यात २०२१च्या अतिवृष्टी, महापूर आणि भूस्खलनामध्ये ऱ्हास झाल्यानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये विविध पर्यटनस्थळांच्या विकासासाठी १० कोटींचा निधी मंजूर झाला होता. या निधीतून घागरकोंडचा झुलता पूल, साखर येथील नरवीर सुर्याजी मालुसरे समाधी आणि उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीस्थळाचे सुशोभीकरण आदी विकास करण्याची तयारी सुरू झाली. कुडपणच्या विकासासाठी तत्कालीन पर्यटन राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी दौरा केला. या निधीची प्रतीक्षा आहे. आमदार गोगावले, मंत्री आदिती तटकरे व खासदार सुनील तटकरे हे महायुती सरकारमध्ये महत्त्वाच्या स्थानावर असल्याने पोलादपूरकरांना पुन्हा पर्यटन विकासासाठी भरघोस निधी मिळण्याची अपेक्षा आहे.

वाकण गोपाळवाडी येथील घागरकोंडकडे जाणाऱ्या रस्त्यावरील २०१६मध्ये लोहरज्जू तुटल्याने नादुरूस्त झालेल्या झुलता पुलाची २०१८मध्ये दुरूस्ती केल्यानंतर २०२१मध्ये हा झुलता पूल पूर्णपणे वाहून गेला.

तत्पूर्वी २०१७मध्ये झुलत्या पुलाजवळून वाहून गेलेल्या हर्ष मुरडे या लहान बालकाचा मृतदेह तब्बल ११ दिवसांनंतर वाकण गावाच्या हद्दीत अंधारीचा डोहात आढळला होता. सद्यस्थितीत झुलता पुलाच्या ठिकाणी केवळ दोन चौथरे असून कोणतेही अन्य अवशेष दिसून येत नाहीत. यामुळे नजिकच्या काळात या ठिकाणी पुन्हा झुलता पूल न उभारल्यास अवैध उद्योगांना या परिसरामध्ये चालना मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## निवडक

### राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**पाली** : शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी आयक्यूएससीचे समन्वयक डॉ. एम. ए. बडगुजर यांनी, आजच्या तरुणांनी शाहू महाराजांचे कार्य समजून घेऊन वाटचाल करावी, असे अध्यक्षीय भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. एस व्ही. पाथरकर यांनी शाहू महाराजांच्या कार्याचे विवेचन केले. अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अनिल झेंडे, भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. एस. ए. पाटील यांनीसुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. स्नेहल बेलवलकर यांनी केले. या वेळी वनस्पती विभागाचे प्रमुख प्रा. यू. बी. इनामदार, इतिहास विभागाचे प्रा. डॉ. एम. ए. सोहनी, भौतिकशास्त्र विभागाच्या प्रा. विशाखा मानकामे, अर्थशास्त्र विभागाच्या प्रा. दीपाली बांगारे, प्रा. भक्ती साजेकर, विद्यार्थी उपस्थित होते.

### गागोदे खिंडीत आढळला मृतदेह

**पेण** : पूर्व विभागातील गागोदे खिंडीत एक मृतदेह आढळल्याने चर्चांना उधाण आले आहे, परंतु पोलीस यंत्रणेने घटनास्थळी दाखल होत मृतदेहाची ओळख पटविली. हा मृतदेह जनार्दन धोडीराम लेंडे (वय ३४) यांचा असून त्यांच्या नातेवाईकांनीदेखील मृतदेहाची ओळख पटवली. पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोलीस सहाय्यक निरीक्षक समद बेग करीत आहेत.

### वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. बुधवारी (दि.२६) २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १६३ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून एक लाख ७४ हजार रुपये इतका दंड आकारला आहे.

### विवाहितेचा छळ; पतीविरोधात गुन्हा

**पेण** : पेणमधील देवनगरी येथे विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला (रा. समर्थ कृपा, देवनगरी, पेण) यांना त्यांच्या पतीने वारंवार, ‘तुझे वडिलांकडून पैसे घेऊन ये, तुझे वडिलांची जमीन माझे नावे कर, तुझ्या आईचे दागिने घेऊन ये’ अशी मागणी करून वेळोवेळी मारहाण करून मानसिक व शारीरिक छळ केला. याप्रकरणी फिर्यादींनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून आरोपीविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा करण्यात आला. अधिक तपास महिला पोलीस हवालदार प्राची शिरगावकर करीत आहेत.

## चौक ते मोरबे धरण रस्त्याची दयनीय अवस्था; अनेक दुचाकीस्वार जखमी

**चौक : प्रतिनिधी**

चौक ते मोरबे धरणाला जोडणारा रस्ता आणि त्या परिसरातील गावात जाणाऱ्या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. या दुर्दशेला रेल्वे प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप स्थानिकांमधून होत आहे.



राष्ट्रीय महामार्ग क्र.४ ते मोरबे धरण यांना जोडणारा रस्ता असून या मार्गावर चौक नवीन वसाहत, नानिवली, नानिवली वाडी, नम्राची वाडी, मोरबे धरणग्रस्त वसाहती, मोरबे धरण प्रकल्प कार्यालय आणि गेल्या वर्षी १९ जुलै २०२३ रोजी इर्शाळवाडी दुर्घटना घडली, त्या गावचे पुनर्वसन याच मार्गावर होत आहे. चौक नवीन वसाहत येथे पनवेल-कर्जत रेल्वेमार्गावर मोठा पूल आहे. याच पुलाखालून सर्व वाहतूक होत असते. मोरबे धरणाकडे जाताना रेल्वेमार्गाचे काम करणाऱ्या यंत्रणेचे गोडाऊन आहे. अवजड वाहनांची सातत्याने ये-जा होत असते. यामुळे रस्त्याची चाळण झाली आहे असे स्थानिकांचे म्हणणे आहे. पुलाखाली पाणी साचत आहे. रस्त्याची चाळण झाल्याने दुचाकीचालक अनेक वेळा पडून जखमी झाले आहेत. पुलाच्या दोन्ही बाजूला अवघड वळणे आहेत. त्यामुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो असे काही तरुणांनी सांगितले. यामुळे रेल्वे प्रशासनाने रस्ता दुरूस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## वाहन भाडे, कंत्राटी तत्त्वावर पुरवण्यासाठी दरपत्रकांचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकत्ता मार्गदर्शन केंद्रासाठी सन-२०२४-२५ या अर्थिक वर्षाकरिता वाहन भाडे अथवा कंत्राटी तत्त्वावर पुरवठा करण्याकरिता दरपत्रके मागविण्यात येत असून इच्छुक वाहन पुरवठादारांनी दरपत्रके खालील नमुन्यात सिलबंद लखोट्यात १ जुलैपर्यंत सादर करावीत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अ.मु.पवार यांनी केले आहे. वाहनाचा तपशिल (कंपनी मेक व मॉडेल), वाहन दर प्रति कि.मी. सर्व करासहित एसी, नॉन एसी, लोकल आठ तासांचे भाडे सर्व करासहित किमान १५० किमी., अतिरिक्त प्रति किमी. दर, २४ तासांचे सर्व करासहित किमान ३०० किमी, अतिरिक्त प्रति कि.मी. दर नमूद करून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग, वैभव निवास, भंडार आळी, चेंढरे अलिबाग येथे पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## उंबरविरा ठाकूरवाडीतील ग्रामस्थ आक्रमक

### जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी मोर्चा

**चौक, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या जांबरूंग- उंबरविरा ठाकूरवाडी येथील आदिवासी बांधवांच्या जांबरुंग धरणासाठी जमिनी पाटबंधारे विभागाने संपादित केल्या आहेत. त्यांना त्या वेळी दिलेला मोबदला हा अतिशय अल्प असून त्यांना आजच्या बाजारभावाप्रमाणे मोबदला मिळावा, यासाठी त्यांनी वरदानी आदिवासी सेवाभावी सामाजिक संस्थेच्या नेतृत्वाखाली खालापूर तहसील कार्यालयावर मोर्चा काढून उपोषण सुरू केले आहे.



सरकारच्या पाटबंधारे विभाग कर्जत यांच्याकडून १९९१-९२ साली आदिवासींच्या ४९.५० हेक्टर जमिन संपादित केली, मात्र त्या जांबरूंग धरणाचे काम २०१९ला सुरू झाले.

अद्यापपर्यंत पूर्ण झाले नाही, मात्र त्या शेतकऱ्यांना आजच्या बाजारभावाप्रमाणे आदिवासी शेतकऱ्यांना गुंठा १२ लाख रकमेच्या चार पटीने तत्काळ मोबदला सरकारने द्यावा, तर जांबरूंग उंबरवीरा येथील शेतकऱ्यांची सर्व भातशेती जमीन पाटबंधारे विभागातून उत्खनन केलेली आहे. या गावात १४५ घरे असून त्यांना सरकारकडून मोबदला मिळत नाही तोपर्यंत उदरनिर्वाहासाठी ५० हजार रुपये पोटगी द्यावी व दोषी अधिकाऱ्यांवर अ‍ॅट्रॉसिटीनुसार गुन्हा दाखल करावा, यासाठी गुरुवारी (दि.२७) सकाळपासून खालापूर तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

या वेळी ग्रामस्थ घनशाम शिद, अनंता मेंगाळ, वाळकू होला, परशुराम साबरी, धर्मा भस्मा, शारदा शिद, कुसुम पारधी, कुसुम कातवारा, ग्रामस्थ उपस्थित होते.

## लोणेरे बाजारपेठेत चिखलाचे साम्राज्य

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील लोणेरे गावातील बाजारपेठेतील मुंबई-गोवा महामार्गाचे अत्यंत धिम्या गतीने चालू आहे. पावसाळ्यापूर्वी हे काम न झाल्याने बाजारपेठेत चिखलाचे साम्राज्य झाले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूने खड्डे पडले आहेत. यामुळे चालताना चिखलातून कसरत करावी लागते.



गटारवर व रस्त्यापर्यंत अतिक्रमण झाल्याने ग्राहकांची कुचंबना होते. शाळेतील विद्यार्थी व प्रवाशांना चालणं कठीण झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व प्रवेश घेण्यासाठी आलेल्या पालकांना फार दूरवस्था झालेली पहायला मिळते. याची मुंबई -गोवा महामार्गाचे अधिकारी व ठेकेदारांनी गांभीर्याने दखल घ्यावी व लोणेरे बाजारपेठेत लोकांनी जे गटारावर अतिक्रमण केले आहेत ते युद्धपातळीवर काढावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

## विद्यार्थ्यांनी मोबाईलचा सदुपयोग करावा -सुरेश गरड

**कर्जत : प्रतिनिधी**

शालेय शिक्षण घेऊन विद्यार्थी महाविद्यालयात पुढील शिक्षण घेण्यासाठी येतात, तेव्हा त्यांना आपण आता मोठे झालो असे वाटते. महाविद्यालयात शिक्षण घेताना मित्रांची संगत महत्त्वाची असते. संगतीमुळे एखादा विद्यार्थी व्यसनाधीन होतो आणि तो आपले आयुष्य उद्ध्वस्त करतो तसेच आपल्या कुटुंबाचेही नुकसान करतो. तंबाखू, सिगारेट किंवा दारू पिणाराच व्यसनाधीन आहे असे नाही, तर विद्यार्थी मोबाईलच्यासुद्धा व्यसनात गुंतत आहेत, ते टाळले पाहिजे. नवीन तंत्रज्ञानाचा चांगला उपयोग करा, असे मार्गदर्शन कर्जतचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांनी केले.



कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये जागतिक व्यसनमुक्ती दिनाचे औचित्य साधून व्याख्यानाचे आयोजन केले होते. पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या हस्ते समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, डॉ. निलोफर खान, डॉ. उज्ज्वला ठुबे, डॉ. हेमंत टवले उपस्थित होते. डॉ. काळे यांनी, विद्यार्थ्यांनी या वयात मेहनत घेतली तर त्याचा फायदा आयुष्यभर होणार आहे, असे सांगितले. सूत्रंचालन प्रा. प्रणिता भांगरे यांनी तर आभार प्रा. काजल खरात यांनी मानले.

संतोष साळुंखे, प्रा. स्वीटी दळवी, प्रा. अश्विनी भोईर, प्रा. वैष्णवी काळे, प्रा. प्रणिता भांगरे, प्रा. अस्फिया खान, प्रा. आसिया दादेल, प्रा. तृणाली घुडे, प्रा. पूजा मोधळे, प्रा. श्वेता दागत, प्रा. मोसिन मंसूरी आदी उपस्थित होते.

## मोरे ते नांदगाव बससेवेसाठी निवेदन

**मुरूड : प्रतिनिधी**

मोरे हे गाव डोंगरात वसलेले आहे. अशा दुर्गम भागातून मुले शिक्षण घेण्यासाठी नांदगाव हायस्कूल येथे येत असतात, परंतु मुरूड आगारातून मोरे येथील मुलांना शाळेत घेऊन जाण्यासाठी एकही बस उपलब्ध नसल्याने मुलांचे हाल होत आहेत. किमान सहा किमीचे अंतर मुलांना चालत जावे लागत असल्याने मुले शाळेत वेळेत पोहचत नाहीत. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

याबाबत अगार व्यवस्थापकांनी विचार करून तातडीने शाळेतील मुलांना बस उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नांदगाव हायस्कूलमधील पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, शिक्षकेतर प्रतिनिधी संतोष बुल्लू, माजी शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर, शिक्षक राहील घलटे आदी उपस्थित होते.

## पेणमध्ये घरावर वीज पडली

### वैकुंठ पाटील यांची तातडीने मदत

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील कणे गावातील गणेश म्हात्रे यांच्या घरावर मंगळवारी (दि.२५) रात्री वीज पडून त्यांचे दीड ते दोन लाखांचे नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेमुळे गणेश म्हात्रे यांच्या आभाळ कोसळले आहे.

दीड ते दोन लाखांचे नुकसान झाले आहे. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी तत्काळ या शेतकऱ्याला मदतीचा हात दिला.

कणे गावातील गणेश म्हात्रे यांचे घरात वीज पडून मोठे नुकसान झाल्याचे समजताच भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी गणेश म्हात्रे यांची भेट घेत त्यांना धीर दिला. या वेळी गावातील दिलीप मात्रे, कुणाल पाटील, धीरज पाटील, संजय म्हात्रे, मनोज पाटील उपस्थित होते.

उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी २५ हजार रुपयांचा धनादेश व ३० हजार रुपयांचे सिमेंट पत्रे दिले. गणेश म्हात्रे यांनी वैकुंठ पाटील यांचे आभार मानले.




## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय: हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ, प्रभादेवी, मुंबई-४०००१३.
दूरध्वनी क्र. ०२२ - ६९३२८१११/ ६९३२८१८१
E-mail: mlwbconteeg@gmail.com, संकेतस्थळ: www.public.mlwb.in

### नोटीस

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये नोटीस देण्यात येते की, खाली दर्शविलेल्या आस्थापना/ संस्थांमधील कामगार/ कर्मचाऱ्यांच्या दिनांक ३१ डिसेंबर २०२० पर्यंतच्या पगार, बोनस वगैरेसारख्या अवितरीत संचयनाच्या रकमा त्यांना न दिल्या गेल्याने मंडळाकडे दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंत जमा झालेल्या आहेत. अशा व्यक्तींच्या नावांची यादी इत्यादी तपशील महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३)(अ) अन्वये संबंधित आस्थापनेच्या/संस्थेच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावा.

संबंधित व्यक्तींना सदर रकमेचा परतावा मिळण्यासाठी त्यांचे संपूर्ण नाव व पत्ता, आस्थापना/संस्थेचे नाव व पत्ता, तिकीट नंबर, हुद्दा व कोणत्या महिन्याची व वर्षाची रक्कम आहे इत्यादी तपशील देऊन आपल्या आस्थापनेच्या शिफारस पत्रासह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्याकडे वरील पत्यावर दोन प्रतीत अर्ज सादर करावा.

| आस्थापनेचे नांव | रक्कम |
|---|---|
| ठाणे / रायगड | रुपये पैसे |
| **ठाणे** | |
| ऑटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चर्स प्रा. लि. | १९६९९२६.७० |
| असाही इंडिया ग्लास लि. | ६४०२४६.०० |
| बायर इंडिया लि. | ५९६६७.०० |
| बायर कॉर्प सायन्स लि. | २००१२८.०० |
| भारत बिजलि लि. (एरोलि) | २६१२२७.७९ |
| सेंच्युरी रेयॉन | ४२८४०.०० |
| कॉन्व्हर्ज्स इंडिया सर्व्हिसेस प्रा. लि. | ४७४१७०.०० |
| क्लियरट्रिप .प्रा लि. | १०४०२९.०० |
| कॅलिबेहर बिजनेस सपोर्ट प्रा.लि. | ८०४५६.०० |
| दलाल इंजीनीयरिंग प्रा.लि. | ३८४६९.०० |
| डिफिन्स निटिंग इंडस्ट्रीज (पी) लि. | २२६२०.०० |
| डीएक्ससी टेक्नॉलॉजी लि. | ९२३०८.०० |
| युरेका आउटसोर्सिंग सोल्युशन प्रा .लि. | ५४८३०.९७ |
| फिनो पेटेक लि. | १०८०७.०० |
| जी.जी दांडेकर इलेक्ट्रिक कं. लि. | १७००००.०० |
| गलॅक्सी सर्फॅक्टंटस लि. | ३४८२७.०० |
| गेब्बस हेल्थकेअर सोल्युशन प्रा. लि. | १०५१३९.०० |
| हॉकिन्स कुकर्स लि. | ३१५५३२.०० |
| आय सी आय सी आय सिक्युरिटी लि. | १२३१८५.०० |
| मेयर ऑरगॅनिक्स प्रा. लि. | ७७६४५८.०० |
| एम.एस.आर.टी.सी (ठाणे डिव्हिजन) | ७५३७०.०० |
| एम.एस.आर.टी.सी (पालघर डिव्हिजन) | ६८२३४.०० |
| नवनीत मोटर्स प्रा. लि. | ४१७६६.०० |
| नोसील लि. | १६२१९२.०० |
| नापतोल ऑनलाइन शॉपिंग प्रा. लि. | १९०९४३.०० |
| सिक्युरिटी अ‍ॅण्ड पर्सनल सर्व्हिसेस प्रा. लि. | ७५०८३.०० |
| सुखी फॅसिलिटी सर्व्हिसेस प्रा. लि. | १३६७३.०० |
| सविता ऑइल टेक्नॉलॉजी लि | १०९३.०० |
| सासी रिट्रेडिंग एंटरप्राइजेस | ३८८५.०० |
| टेक्सन्स लि. | ५३४९६८.०० |
| टर्टलमेंट इंन्शुरन्स ब्रोकींग सर्व्हिसेस प्रा. लि. | १६७८३.०० |
| वी२ टेक वेन्चूरन्स प्रा.लि. | १८४३१७.०० |
| **रायगड** | |
| बालाजी एंटरप्राइजेस | १६२३६.०० |
| बॉम्बे ब्रेवरीज लि. | २३६७४.०० |
| एक्साइड इंडस्ट्रीज लि. | १२६२७१.०० |
| थरमॅक्स लि. | १७६२४६.०० |

स्वाक्षरीत/-
कल्याण आयुक्त
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

उपरोक्त जाहीर केलेल्या अवितरीत संचयनाच्या न दिल्या गेलेल्या पगार वगैरे सारख्या रकमांमध्ये मंडळाकडे दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत जमा झालेल्या आणि मागील सलग तीन वर्ष नोटीसीद्वारे जाहीर केलेल्या रकमांचा महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६-अ (३) अन्वये समावेश करण्यात आलेला नाही. तसेच या रकमांमध्ये दिनांक ०१.०४.२०२१ ते ३१.०३.२०२४ या तीन वर्षाच्या कालावधीत मंडळाकडे जमा झालेल्या सर्व रकमांचा समावेश करण्यात आलेला आहे.

# विकसकांच्या सुविधांबाबत सिडको सकारात्मक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सिडको व नैना क्षेत्रातील विविध समस्या सोडवण्याच्या दृष्टीने सिडकोने केडाई एमसीएचआय, नवी मुंबईच्या विकसकांची बैठक आयोजित केली होती. यात विविध सोयी-सुविधा आणि धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत सकारात्मक पाऊले उचलले जातील, असे आश्वासन सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल यांनी विकासकांना दिले.

नवी मुंबईतील उलवे येथील सेक्टर २६, २७, २८, २९ येथे भूखंड वाटप करून चार ते पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटूनसुध्दा कोणत्याही सोयी-सुविधा दिलेल्या नाहीत. उलटपक्षी या ठिकाणी दगडांचे डोंगर अस्तित्वात असल्याचे दिसून येते. याचे टेंडर काढण्यासाठी मोठा कालावधी गेला असून लवकरात लवकर त्याचे तोडकाम करून भूखंडाचा ताबा देण्यात यावा. या जागेवर प्रत्यक्ष व्यवस्थापकीय संचालक यांनी पाहणी दौरा केला असून ही कामे तत्काळ करण्याबाबत यापूर्वीच आदेश देण्यात आलेले आहेत. जे भूखंड वाटप झालेले आहेत अशा जागेवर सर्वप्रथम तोडकाम करण्याबाबत प्रकाश बाविस्कर यांनी केलेली विनंती या वेळी मान्य करण्यात आली.

काही ठिकाणी भूखंड वाटप करण्यात आले असून तेथे सिडकोकडून अद्याप जमिनीचे भूसंपादन करण्यात आलेले नाही. याकरिता सिडकोमध्ये पाठपूरावा घेणारी वेगळी डेक्स तयार करण्यात




### 'नैना'बाबतचे धोरणही केले स्पष्ट

नैना क्षेत्रात खासगी अनेक नगरवसाहती आहेत. यामुळे अनेकांना घरे मिळाली असून शासकीय महसूल व सिडकोस मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ होत आहे. केंद्र व राज्य शासनाचे 'सर्वांसाठी घरे' या योजनेच्या पूर्ततेमध्ये अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. स्थानिक प्राधिकरण म्हणून सिडकोला मोठ्या प्रमाणात रक्कम प्राप्त होते. या अनुषंगाने सिडकोला विनंती करण्यात आली की, नैनाच्या दूसऱ्या टप्प्यांतसुध्दा सिडकोने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने रस्त्याचे भूसंपादन, बांधकाम, पाणी, बांधकाम परवानगी व इतर ना हरकत दाखले देणेबाबत मागणी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालय व सिडकोमध्ये आरक्षणाचे भूसंपादन करण्याबाबत समन्वय नसल्याने या कामास उशीर होत आहे. तो समन्वय ठेऊन मदत व्हावी, अशी मागणी करण्यात आली. यावर सिडकोचे मूख्य भूमी व भूमापन अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

## विविध प्रश्नासंदर्भात चर्चा

येऊन भूधारकांमार्फत चर्चा करून प्रश्न सोडवावेत याबाबत सिडको सकारात्मक असल्याचे तसेच अशा भूधारकांना भूसंपादन झालेल्या क्षेत्रात नवीन भूखंड वाटप करण्यात येईल, असे गोयल यांनी सांगितले.

साडेबारा टक्के व साडेबावीस टक्के योजनेत अनेक वर्ष वाटपाचे कार्य सुरू असून ड्रॉ पध्दतीने भूखंड वाटप करण्याऐवजी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर पूर्वी भूखंड वाटप केले जात होते त्याचपध्दतीने वाटप करावे. व हा प्रश्न लवकर सोडवावा अशी विनंती प्रकाश बाविस्कर यांनी केली असता याबाबत व्यवस्थापकीय संचालक यांचे निदर्शनास आणून सकारात्मक दृष्टीने व लवकरात लवकर भूखंडवाटपाच्या उद्देशाने सिडकोकडून पाऊले उचलले जातील असे सांगण्यात आले.

युडीसीपीआरच्या सर्व अटीशर्ती लागू करण्यासंदर्भात काही अडचणी असल्यास विकासकांनी विनंती केली की, वारंवार शासनाकडून स्पष्टीकरण न मागवता सिडकोच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून अंमलबजावणी करावी, अशी विनंती विकसकांनी केली असता याबाबत कोणत्या अटीशर्ती अडचणीच्या आहेत त्या सिडकोकडे सादर करण्याबाबत सिडकोकडून विकासकांना सांगण्यात आले. अंतिम नैना डीसीपीआर सिडकोच्या वेबसाईटवर पब्लिश करण्यात यावा यावर सिडकोचे मुख्य नियोजनकार रवींद्र मानकर यांनी माहिती दिली की, मागणीप्रमाणे १३७ क्रमांकावर हा डीसीपीआर अपलोड करण्यात आला आहे.

यानंतर सिडकोचे नवनिर्वाचित सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले यांचेकडे भेट घेऊन क्रेडाई एमसीएचआयच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन सिडकोबाबतच्या विकासकांच्या विविध समस्या अवगत करण्यात आल्या. आणि गणेश देशमूख यांची सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकपदी शासनातर्फे निवड झाल्याने स्वागत करण्यात आले.

नवनिर्वाचित व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांचेकडे बैठकीकरता केडाई एमसीएचआय, नवी मुंबई यांचेकडून बैठकीची मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने व व्यवस्थापकीय संचालक यांच्या आदेशाने सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल यांनी ही बैठक आयोजित केली.

# नवी मुंबईत गांजा विकणारे दोघे अटकेत; तीन जण फरार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**




पोलिसांच्या सातत्यपूर्ण कारवाईमुळे एकाच ठिकाणी गांजा विकणे धोकादायक झाल्याने आता गांजा विक्रेते फिरस्तीप्रमाणे रोज जागा बदलून गांजा विकतात. असाच एक प्रकार समोर आला असून बस थांब्यावर गांजा विक्री करणाऱ्या दोन आरोपींना रबाळे पोलिसांनी अटक केली आहे.

समशेर पीर खान, दिलीप बरुआ असे अटक आरोपींची नावे असून संजू उर्फ मोट, शम्मो, वसीम हे फरार आरोपी आहेत. गांजा विक्रीविरोधात नवी मुंबई पोलिसांनी नशा मुक्त नवी मुंबई हा उपक्रम राबवत असल्याने गांजा विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. त्यामुळे गांजा विक्री करण्यासाठी रोज जागा बदलली जात असल्याने पोलिसांनी त्यावरही नजर ठेवणे सुरू केले आहे. बदलेली जागा गांजा खरेदी करणाऱ्यांना मात्र माहिती असते. अशाच प्रकारे गांजा विक्री करण्यासाठी ऐरोलीतून मुलुंडकडे जाणाऱ्या गरम मसाला बस थांब्यावर गांजा विकणारे दोन संशयित पोलिसांना आढळून आले. दोघांना ताब्यात घेत झडती घेतली असता त्यांच्याकडे २० हजार रुपयांचा एक किलो गांजा आढळून आला.

काडीदार पाने, बिया फुले पाने अशा स्वरुपात सदर गांजा होता. गांजा खरेदी आणि विक्रीसाठी संजू उर्फ मोट, शम्मो, वसीम हे आरोपींना मदत करत असल्याचे समोर आले. पोलिसांनी समशेर आणि दिलीप यांना अटक केली असून अन्य तिघांचा शोध सुरू आहे. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक दयानंद वणवे हे तपास करीत आहेत.

दरम्यान, नवी मुंबई परिसरात गांजा विकणाऱ्यांची संख्या वाढली असून त्यांच्यावर कारवाई करण्याचे पोलिसांसमोर आव्हान आहे.



नवी मुंबई : कोकण पदवीधर मतदारसंघांमध्ये मतदान प्रक्रिया शांततामय आणि शिस्तबद्ध रितीने झाली. बेलापूर विधानसभा क्षेत्रात महायुतीचे उमेदवार ॲड. निरंजन डावखरे व आमदार मंदा म्हात्रे यांनी वेगवेगळ्या बूथवर भेट देऊन मतदान प्रक्रियेचा आढावा घेतला.




नवी मुंबई : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त बुधवारी नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयात आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शिरीष आरदवाड, उपायुक्त शरद पवार, किसनराव पलांडे आदी उपस्थित होते.

# एनएमएमटी सेवेच्या तक्रारींबाबत आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

संभाव्य नैसर्गिक आपत्तीमध्ये किंवा अन्य वेळी देखील एनएमएमटी सेवेविषयी प्रवाशांच्या काही तक्रारी असतील, तर त्यांनी १८००२२००४७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन एनएमएमटी प्रशासनाने केले आहे. याविषयीचे सूचना पत्रक सर्व बसमध्ये लावण्यात आले आहे.

या सूचना पत्रकात म्हटले आहे की, संभाव्य अतिवृष्टी आणि संततधार पाऊस यांमुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी एनएमएमटी प्रशासन सज्ज आहे. प्रवाशांनी एनएमएमटी बसेस मधून प्रवास करीत असताना उपक्रमाच्या बसेस रस्त्यावर ब्रेकडाऊन झाल्यास, काही नैसर्गिक आपत्ती ओढावल्यास, सेवाविषयक काही तक्रारी असल्यास तात्काळ उपक्रमाच्या १८००२२००४७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ही सेवा २४ तास निःशुल्क कार्यान्वित आहे. तसेच तुर्भे आगार (८३५६८३३५६६), आसुडगाव आगार (८३५६८३३३९०) आणि घणसोली आगार (८३५६८३३५४५) या देखील क्रमांकावर प्रवाशी संपर्क साधू शकतात.

जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांच्या समस्या दुर करून त्यांना अधिकाधिक सुरळीत आणि सुरक्षित सेवा देणे सोईस्कर होईल, असे आवाहन नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापक योगेश कडूसकर यांनी केले आहे.

# कोपरखैरणे पोलिसांकडून ३१ नागरिकांना हरवलेले मोबाईल सुपूर्द

**नवी मुंबई :** सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर (सीईआयआर) पोर्टलची मदत घेत कोपरखैरणे पोलिसांनी चोरी गेलेले ३१ मोबाइल शोधून काढले आहेत. नुकतेच हे मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत. एक लाख चाळीस हजारांचा आय फोन ते पाच हजारांच्या साध्या फोनचाही यात समावेश आहे.

मोबाइल गहाळ झाल्यावर वा चोरी झाल्यावर तो शोधणे आता सोपे झाले असून सीईआयआर या पोर्टलवर मोबाइलची तांत्रिक माहिती टाकली असता सध्या मोबाइल कोणत्या ठिकाणी आहे, त्यातील सिमचा क्रमांक काय याची माहिती मिळते. याचाच आधार घेत कोपरखैरणे पोलिसांमध्ये कार्यरत असलेले हवालदार राहुल मोरे यांनी सर्व मोबाईल हस्तगत केले. यात एक आयफोन दुबई येथून मिळवण्यात यश मिळाले आहे. मोबाईल अज्ञात चोरट्याने विकला जो दुबईत वापरला जात होता. त्यात वापरण्यात येणाऱ्या क्रमांकावर संपर्क साधून मोबाईल चोरीचा असल्याचे सांगण्यात आले होते. सर्वच मोबाईल हे लोकेशन आणि त्यात वापरला जाणारा क्रमांक मिळवत स्थानिक पोलिसांच्या मदतीने हस्तगत करण्यात आले आहेत. या सर्व मोबाईल संचांची किंमत आठ लाख रुपये आहे.

# वडगाव शाळेत पर्यावरणावर चित्रकला स्पर्धा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिन व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव रसायनी येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन माझी जबाबदारी,पर्यावरण संरक्षणात माझी जबाबदारी, या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या वेळी ९०हुन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रत्येक गटातून प्रथम व द्वितीय येणाऱ्या मुलांना रोख रक्कम, पारितोषिक गौरी गडगे, मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या वतीने गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयी आवड निर्माण व्हावे, शिवाय त्यांचे महत्व काय असते. या माध्यमातून त्यांचे महत्त्व समजावे, वृक्ष लागवड ही काळाची गरज असून त्यांचे संवर्धन ही महत्वाचे आहे. या दोन्ही बाबीचा समन्वय साधून आपणांस या वृक्षांची काळजी घेतली



पाहिजे, मानवांस शुद्ध हवा, वेळेवर पाउस पडणे, हवा, औषधे, जाळण्यासाठी लाकूड, शेतीचे अवजारे, अश्या अनेक माध्यमातून या वृक्षांचा उपयोग होत असतो. शिवाय वाढीव तापमान यां वरती वृक्ष लागवड शिवाय पर्याय असून या उद्दात विचारांतून हा उपक्रम हाती घेण्यात आला.

पहिली ते तिसरी गटात, प्रथम क्रमांक रोनक राजेंद्र जांभुळकर, द्वितीय स्वराली अनंता घोरपडे, चौथी ते पाचवी गटात समर्थ गणेश मुंढे प्रथम, मनस्वी विजय गडगे द्वितीय तर सहावी ते आठवी गटात यश तानाजी पाटील प्रथम तर कृतिका गोपीनाथ गडगे द्वितीय क्रमांक पटकावला. या वेळी उप शिक्षक वौजिनाथ जाधव, विषय शिक्षिका सरस्वती कवाद, स्वयंसेविका निकिता गडगे, साक्षी जांभुळकर, भाग्यश्री तांबोळी सोनू जाधव व पालकवर्ग उपस्थित होते.

# तुर्भे विभागात प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

शहर प्लास्टिकमुक्त असण्यासाठी नवी मुंबई महापालिका सातत्याने विविध माध्यमांतून प्रयत्न करत असून नागरिकांनी प्लास्टिक पिशव्या तसेच एकल वापर प्लास्टिकचा वापर न करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

यासोबतच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमाही राबविण्यात येत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार एकल वापर प्लास्टिक फ्री मार्केट ही संकल्पना राबविली जात आहे. या मार्केटमध्ये नागरिकांच्या सोयीसाठी कापडी पिशव्या



वेंडींग मशीन लावण्यात येत आहेत.

प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिम राबवताना तुर्भे विभाग कार्यालयांतर्गत सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी भरत धांडे यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे आणि परिमंडळ १ चे उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर करणाऱ्या दोन व्यावसायिकांवर कारवाई करत प्रत्येकी पाच हजार रुपयांप्रमाणे एकूण १० हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम जमा केली. तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता पसरवणाऱ्या दोन व्यावसायिकांविरुध्द कारवाई करुन प्रत्येकी २५० रुपये प्रमाणे एकूण ५०० रुपये इतका दंड वसूल केला. या कारवाईमध्ये स्वच्छता अधिकारी जयेश पाटील आणि स्वच्छता निरीक्षक सहभागी होते.

# वाशिवलीतील डॉ. पारनेरकर विद्यालयात विविध कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून रसायनी पाताळगंगा येथील बॉम्बे डाईंग कंपनीतर्फे पर्यावरण संवर्धन व संगोपन या विषयास अनुसरून वाशिवली येथील डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमातंर्गत शाळेच्या परिसरात मुख्याध्यपक सोनवणे सर, प्राचार्य जोशी सर आणि बॉम्बे डाईंग कंपनीचे उपाध्यक्ष (उत्पादन) बी. पी मिश्रा, महाव्यवस्थापक सोमेश्वर काळे व कंपनीच्या पर्यावरण, आरोग्य, सुरक्षा, व्यवस्थापन प्रणाली विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक अतुल मोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत हे लहान वृक्ष देऊन करण्यात आले. बॉम्बे डाईंग कंपनीचे उपाध्यक्षक (उत्पादन) बी. पी मिश्रा यांनी




पर्यावरणाशी कसे जुळवून घेता येईल व पर्यावरण संवर्धन हिच सर्वांची बांधिलकी आहे. याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, महाव्यवस्थापक सोमेश्वर काळे यांनी विद्यार्थ्यांना आजची परिस्थिती आणि प्रदूषण याच्यामुळे आपल्या पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम आणि त्यातून पृथ्वीला कसे सुरक्षित करता येईल व तिचे संगोपन कसे करता येईल याविषयाला अनुसरून मार्गदर्शन केले. व शाळेचे मुख्याध्यापक सोनवणे, प्राचार्य जोशी यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

वाशिवली येथुन डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कंपनीतर्फे वह्यांचे वाटप करून विद्यार्थाना त्याच्या पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

वृक्षारोपणानंतर पर्यावरण संवर्धन व संगोपन या विषयाला अनुसरून जमीन पुनर्संचयित करणे, वाळवंटीकरण आणि दुष्काळाची स्थितिस्थापकत्व याविषयांवरती बॉम्बे डाईंग कंपनीचे अतुल मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात प्रश्नमंजुषा या उपक्रमामध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या सफल आयोजनात बॉम्बे डाईंगचे ऊर्जा सहाय्यक महाव्यवस्थापक निलेश जाधव, वरिष्ठ व्यवस्थापक नंदू हडप, व्यवस्थापक पंकज दवे, अंशुमन दुरगकर, असिफ अनीस, कर्मचारी रमाकांत महाना, अनिश कान्हेरे आणि शाळेचे प्राचार्य सोनवणे सर, पाटील सर, जोशी सर व कर्मचारी तथा इतर शिक्षक वर्ग यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे समारोपण अल्पोपहाराने करण्यात आले.

# स्वच्छताविषयक कार्यात विद्यार्थ्यांची आघाडी



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ लस्वच्छता व आरोग्याचा परस्पर संबंध लक्षात घेऊन स्वच्छ भारत मिशन अंतर्गत 'सफाई अपनाओ-बिमारी भगाओ' हा अभिनव उपक्रम जाहीर करण्यात आला असून नवी मुंबई महापालिका यामध्ये उत्साहाने सहभागी झालेली आहे.

या अनुषंगाने नवी मुंबई महापालिका शाळा क्र. १८, सानपाडा येथे 'शून्य कच-याची सुरुवात माझ्यापासून' या उपक्रमांतर्गत शाळेतील १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सुका कचरा संकलन मोहीमेत सक्रिय सहभागी होत १५२ किलो कचरा संकलित केला. प्रत्येक विद्यार्थ्याने संकलित केलेल्या सुक्या कचऱ्याची नोंद त्याच्या स्वच्छता पासबुकमध्ये करण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच स्वच्छतेची आवड निर्माण करणाऱ्या या उपक्रमाची प्रशंसा विद्यार्थ्यांच्या पालकांकडूनही करण्यात येत आहे. या उपक्रमाव्दारे नवी मुंबई शहराचे भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शहर स्वच्छतेचे भविष्य आश्वासित करण्यात येत आहे.

# मुरुडमधील शासकीय कार्यालयांना गळती

## ◆ तात्पुरती डागडुजी न करता कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज



**मुरूड : प्रतिनिधी**

शहरामधील सर्व शासकीय इमारती या नवाबकालीन असून पावसाळा सुरू झाला की, दरवर्षी प्रत्येक कार्यालयाच्या छतावर प्लास्टिक टाकावे लागत आहे. शासकीय सर्व इमारती अद्ययावत ठेवणे हे सार्वजनिक बांधकाम खात्याचे काम असतानादेखील दुर्लक्ष केल्यामुळे आज प्रत्येक कार्यालयास प्लास्टिकचे आवरण घातले जात आहे. पोलीस ठाणे, तहसील कार्यालय, वनखाते कार्यालय आदींना दरवर्षी प्लास्टिकसाठी खर्च करावा लागत आहे.

गेल्या काही वर्षांपासून पावसाळा सुरू होतो न होतो तोच मुरूडमधील ग्रामीण रुग्णालयात गळती सुरू होते. यंदाही या समस्येवर उपाय म्हणून छतावर प्लास्टिकचा वापर करण्यात आला आहे. मुरूड तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी तहसीलदार कार्यालय, वनविभाग, पंचायत समिती, सेतू, ग्रामीण रुग्णालय, विविध कार्यालये असून काही कार्यालयात महत्त्वाचे दस्तावेज असतात. शहरासह तालुक्यातील विविध ठिकाणांहून शासकीय कामासाठी लोकांची लगबग असते. गेल्या काही वर्षांपासून पावसाळा सुरू झाला की, येथील कार्यालयांच्या गळतीला सुरुवात होते. त्यावर उपाय म्हणून प्लास्टिकचा वापर केला जातो.

दरवर्षी प्लास्टिक अंथरण्यासाठी खर्च होत आहे, परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग या कार्यालयांची दुरूस्ती करीत नाही. सतत पाणी गळत राहिल्याने महत्त्वाचे दस्तावेज खराब होत असतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांमधूनही नाराजी पयरली आहे.

## निवडक

### अमली पदार्थविरोधी जनजागृती



**पोलादपूर** : अमली पदार्थविरोधी दिनानिमित्त पोलादपूर पोलीस ठाण्यातर्फे जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले. या प्रचार फेरीमध्ये सुंदरराव मोरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पोलीस निरीक्षक अनिल जाधव, सहाय्यक निरीक्षक जयसिंग पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या जनजागृती फेरीमध्ये विद्यार्थ्यांनी ड्रग्स, तसेच अन्य अंमली पदार्थ, तसेच विविध व्यसने यांच्या विरोधात फलक व घोषणांद्वारे जनजागृती केली. पोलीस हवालदार सरणेकर, मोरे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. राम बरकुले, प्रा. स्नेहल कांबळे, प्रा. डॉ. वसंत डोंगरे, प्रा. डॉ. शैलेश जाधव आदींनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

### सुनील कुथे नागोठणे 'लायन्स' अध्यक्ष



**नागोठणे** : लायन्स क्लब नागोठणेचा शपथविधी सोहळा डिस्ट्रिक्ट ३२३१ए ४चे व्हाईस गव्हर्नर एमजेएफ प्रवीण सरनाईक यांच्या उपस्थितीत झाला. यामध्ये अध्यक्षपदी सुनील कुथे, उपाध्यक्षपदी संतोष शहासने, सचिवपदी डॉ. अनिल गिते, खजिनदारपदी दिपक गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या वेळी डिस्ट्रीक्टकडून लायन्स क्लब नागोठणेसाठी चांगल्या कार्यासाठी गोल्ड मेडल तर उत्तम सेक्रेटरीपदाचे कार्य याबद्दल म्हणून विवेक सुभेकर यांना सन्मानित करण्यात आले. यासोबत झोन चेअरमन यशवंत चित्रे व डिस्ट्रीक्ट चेअरमन प्रकाश जैन यांनाही सन्मानित करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून रिजन चेअरमन विजय वनगे, झोन चेअरमन लायन विवेक सुभेकर, डिस्ट्रीक्ट कॅबिनेट जॉईन्ट सेक्रेटरी लायन नुरुद्दीन रोहावाला, डिस्ट्रीक्टचे मायक्रो कॅबिनेटचे अनिल म्हात्रे, विजय गणात्रा, नयन कवळे, विवेक करडे, सुधाकर जवके, विलास चौलकर, विनोद सावंत, संजय काकडे, सुजाता जवके, स्मिता कुथे, दिपक लोणारी, अमित मोदी आदी उपस्थित होते.

### अंजुमन इस्लाम कॉलेजमध्ये न्याय दिन



**मुरूड** : लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अंजुमन इस्लाम जंजिरा पदवी महाविद्यालयात बुधवारी (दि. २६)प्रभारी प्राचार्य डॉ. साजीद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रंथालय विभाग यांचातर्फे वक्तृत्व स्पर्धा आणि निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली, तसेच छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित चित्रफीतसुद्धा प्रदर्शन करण्यात आले. डॉ. फिरोज शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सामाजिक न्यायचे महत्त्व पटवून दिले. प्रा. अल्ताफ फकीर यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रंथपाल प्रा. अंजुम दाखवे व विद्यार्थी प्रतिनिधी हुमेरा घारे, अफ्शा उल्डे, सना कारबारी यांनी परिश्रम घेतले.

## मुरूडमध्ये 'पदवीधर'साठी उत्साहात मतदान



**मुरूड : प्रतिनिधी**

कोकण पदवीधर मतदार संघासाठी बुधवारी (दि.२६) मतदानासाठी तरुणांमध्ये उत्सहाचे वातावरण पाहावयास मिळाले. तालुक्यात १०४९ मतदाते होते.

तालुक्यात ५९.१० टक्के मतदान झाले. जोरदार पाऊस असतानासुद्धा मतदाते मतदानासाठी बाहेर पडले होते. मुरूड तहसील कार्यालयाने दोन बूथची व्यवस्था करण्यात आली होती. तहसीलदार रोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान केंद्र ६६(२) केंद्राध्यक्ष संजय तवर, सूक्ष्म निरीक्षक मुकेश झा, मतदान अधिकारी रुपेश रेवस्कर, विजय म्हापुसकर, रोहन निरगुडकर, संदेश वाळंज तर मतदान केंद्र ६६(२अ) मतदान केंद्राध्यक्ष राजेश्री साळवी, सूक्ष्म निरीक्षक प्रकाश गोंजी व मतदान अधिकाऱ्यांनी कामकाज पहिले.

## मुंबई-पुणे महामार्गावर खड्डे बुजविण्याचे काम सुरू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर खालापूर ते खोपोली मार्गाची पहिल्या पावसात चाळण झाली असून तीन किमीमध्ये खड्डे पडले आहेत. मंगळवारी पावसाने घेतलेल्या विश्रांतीमुळे खडीमिश्रित डांबर टाकून खड्डे बुजवण्याचे काम आयआरबीने हाती घेतले होते.

खालापूर ते खोपोली फाटा रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम २०१७मध्ये झाले होते. ठेकेदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्याने दरवर्षी पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडत असून जीवघेणे अपघात घडले आहेत.



रस्ता तयार करताना अतिशय निकृष्ट मालाचा वापर केल्याने जीवघेणा अपघात घडले होते. प्रवाशी आणि स्थानिकांचा उद्रेकामुळे अखेर खड्डे बुजवण्यासाठी पेव्हरब्लॉकचा पर्याय म्हणून वापर करण्यात आला. रस्त्याच्या कामात खडीपेक्षा मातीचा वापर आधीच्या ठेकेदाराने केल्याने पेव्हरब्लॉक बसविणे हा पर्याय शिल्लक राहिला होता, परंतु त्यानंतर यंदाच्या पावसाळ्यापूर्वी दुरूस्ती होणे आवश्यक होते, परंतु दुरूस्ती न झाल्याने खालापूर ते महड अवघ्या तीन किमी अंतरावर खड्ड्यांनी शंभरी गाठली.

लागोपाठ पडलेल्या खड्ड्यांचा आकार आणि खोलगटपणा असल्याने खड्डे चुकवताना चालकांची कसरत होत आहे. दुचाकीचे किरकोळ अपघात देखील घडले. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रस्त्याची ही अवस्था झाल्याने प्रवासी संताप व्यक्त करीत होते. अखेर दोन दिवस पावसाने विश्रांती घेतल्यानंतर खड्डे बुजवण्याचे काम आयआरबीकडे देण्यात आले.

## पालीतील नादुरूस्त सीसीटीव्ही कॅमेरे दुरूस्त करण्याची मागणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली नगरपंचायत परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे नादुरूस्त असल्याने केवळ शोभेची वस्तू असल्यासारखे झाले आहेत. याचा पोलीस प्रशासनास काहीसा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे हे सीसीटीव्ही कॅमेरे दुरूस्त करावेत, अथवा त्याजागी नवीन चांगल्या दर्जाचे कॅमेरे



बसविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात येत आहे.

परिसरातील ९० टक्के सीसीटीव्ही कॅमेरे हे नादुरूस्त असल्याने पोलीस प्रशासनाला गुन्ह्यांची उकल करण्यास अडचणीचे ठरत आहे. भुरट्या चोऱ्या, साखळी चोर यांचे फावते आहे. सार्वजनिक ठिकाणे, संवेदनशील अडगळीच्या जागा, हटाळेश्वर चौक इतर चौकातील येथील सीसीटीव्ही कॅमेरे दुरूस्ती करण्यात यावी, अशी मागणी जोर धरीत आहे.

## पद्मदुर्ग व्यावसायिक मंडळाकडून वृक्षारोपण

**मुरूड : प्रतिनिधी**

पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळातर्फे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी यंदा दरबार रोड मार्गावरील ग्रामीण रुग्णालय, तहसील कार्यालय, पोलीस ठाणे व सार्वजनिक ठिकाणी शुक्रवारी (दि.२७) वृक्षारोपण करण्यात आले.

अध्यक्ष अरविंद गायकर, उपाध्यक्ष दिव्या सतवीडकर, दीपक जोशी, देवेंद्र सतवीडकर, उत्तम पाटील, शकील शहाबान, नायब तहसीलदार शेखर खोत, डॉ. उषा चौले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप कार्यकारी अधिकारी गोरे, पोलीस निरीक्षक निशा जाधव, पोलीस उपनिरीक्षक



अविनाश राठोड आदी या वेळी उपस्थित होते. या वेळी अर्जुन, वड, सावर व पिंपळ अशाप्रकारची ५० झाडे लावण्यात आली.

## नशा करा ती फक्त अभ्यास आणि खेळाची -पोलीस अधिकारी शीतल राऊत

**खोपोली : प्रतिनिधी**

अमली पदार्थांच्या सेवनामुळे तरूण पिढी ऐन तारुण्यात बरबाद होत आहे. आजची तरूण पिढी देशाचे उज्ज्वल भविष्य आहे. नशा करा ती फक्त अभ्यासाची आणि मैदानी खेळाची. मैदानी खेळामुळे आपण शारीरिक, मानसिक आरोग्य तंदुरुस्त राहते. अमली पदार्थ आणि मोबाईलपासून दूर रहा, असे आवाहन खोपोली वरीष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांनी केले. व्यसनमुक्तीचे संस्कार आपल्या कुटुंबातून केले पाहिजे, असेही राऊत म्हणाले.

जागतिक अमली पदार्थविरोधी दिनानिमित्त बुधवारी (दि.२६) नशामुक्त भारत अभियनांतर्गत खोपोली पोलीस ठाण्याच्या वतीने जनता विद्यालय ज्युनियर कॉलेजमध्ये वरीष्ठ पोलीस निरिक्षक शीतल राऊत यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. पोलीस तुमचे मित्र आहेत. काहीही आडचणी आल्यास पोलिसांशी संपर्क साधा, असे आवाहनही या वेळी राऊत यांनी केले.


या वेळी मुख्याध्यापक प्रदिप देशमुख, उपप्राचार्य के. एम. गोरे, धनश्री कोंडुस्कर, खोपोली पोलीस गोपनीय विभागाचे सतीश बांगर, प्रदीप खरात आदी उपस्थित होते. व्यसनाधितेमुळे आजची पिढी पोखरली जात आहे. या परिणाम कुटुंब व समाजावर होत आहे. त्यामुळेच तरूणांमध्ये जनजागृती पोलीस करीत असल्याचे प्रास्ताविकातून धर्मेंद्र म्हात्रे सांगितले. गोपनीय विभागाचे प्रदीप खरात यांनी व्यसनमुक्तीची प्रतिज्ञा दिली.



## श्रीवर्धनमध्ये पावसाला सुरुवात होताच वीज गायब

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरासह संपूर्ण तालुक्यामध्ये पावसाला सुरुवात झाल्याबरोबर काही वेळातच महावितरणकडून वीजपुरवठा गायब झाला. खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत होण्यास पाच ते सहा तासांचा कालावधी लागत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. अनेक वेळा वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर महावितरणचे अभियंता फोन उचलण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे.



अद्याप पावसाळा सुरू झाला असला तरी सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडत नसल्याने वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. महावितरणकडून पावसाळ्याअगोदरची कामे करण्यासाठी अनेक वेळा संपूर्ण दिवसभर वीजपुरवठा खंडित करण्यात येतो, मात्र एवढी सगळी कामे महिन्यातून चार वेळा दिवसभर वीजपुरवठा बंद ठेवून करूनसुद्धा पावसाळा सुरू झाल्यानंतर वीजपुरवठा का खंडित होतो? याचे उत्तर महावितरणचे अभियंता देऊ शकत नाहीत. त्यामुळे व्यावसायिकांचे, नागरिकांचे विविध कामासाठी नेटवर्क नसल्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

महावितरण नागरिकांकडून बिल वसूल करताना त्यामध्ये स्थिर आकार, वीज आकार, वहन आकार, इंधन समायोजन आकार, वीज शुल्क, वीज विक्रीकर, व्याज, निव्वळ थकबाकी, समायोजित रक्कम, व्याजाची थकबाकी, एकूण थकबाकी आदी ग्राहकांकडून वसूल करीत असतात.

त्याशिवाय १०० युनिट, त्याच्यापेक्षा जास्त होणारे युनिट, त्याच्यापेक्षा जास्त होणारे युनिट, यावर वेगवेगळे विजेचे दर लावले जातात. वीज ग्राहकांकडून एवढ्या मोठ्या रकमेची लूट करूनसुद्धा ग्राहकांना योग्यप्रकारे वीजपुरवठा करण्यामध्ये महावितरण पूर्णपणे अकार्यक्षम ठरत असल्याचे पाहायला मिळत आहे.


## चिवण्या खरेदीसाठी खवय्यांची गर्दी


**पाली : प्रतिनिधी**

पावसाळयात खाडीकिनारी चिवणी मासे मोठ्या प्रमाणात मिळू लागले आहेत. चिवण्या बाजारात विक्रीसाठी दाखल झाल्याने खवय्ये आनंदी झाले आहेत. सध्या ४०० रुपये किलो मिळत आहेत. विविध ठिकाणी हे दर कमी-अधिक आहेत.

खाडीच्या मुखाच्या भागात चिवण्या अधिक प्रमाणात सापडतात, मात्र खाडीकिनारी प्रदूषित झाल्याने चिवण्यांचे प्रमाण घटले आहे. खाडीकिनारी हे मासे अंडी घालतात. पावसाच्या सुरुवातीला गाबोळी म्हणजेच पोटात अंडी असलेल्या चिवण्या अधिक सापडतात. अशा वेळी मासेमार व स्थानिक मोठ्या प्रमाणात चिवण्या पकडतात.

सध्या या चिवणी माशांची आवक अलिबाग, पेण, उरण, पनवेल, पाली, रोहा आदी मासळी बाजारात काही प्रमाणात सुरू झाली आहे. त्यामुळे खवय्ये आनंदी आहेत.





"हंगामातील पहिलेच चिवणी मासे असल्याने मागणी खूप आहे. खवय्ये खरेदीसाठी तुटून पडत आहेत. काही दिवसांनी पाऊस सुरू झाल्यावर आवक वाढल्यानंतर चिवण्या स्वस्त होतील. या माशांच्या अंड्यांना मोठी मागणी असते.

**-गौरी मनोरे**, मासळी विक्रेत्या,

"पेण-पाली चिवणी मासे खूप चविष्ट असतात. या मोसमात मिळणारे चिवणी मासे आवर्जून खातो. स्वतः जाळे घेऊन मासे पकडायला जातो. वलगणीतदेखील सापडतात.

**-ॲड. राकेश पाटील,** खवय्ये, अलिबाग

### *वैशिष्ट्यपूर्ण शारीरिक रचना*

*चिवणीची त्वचा अतिशय चिकट व तेलकट असते. त्यामुळे तो हातात धरताना सटकतो. या माशाच्या डोक्याजवळ टणक अणकुचीदार काटा असतो. त्यामुळे मासा सांभाळून पकडावा लागतो. त्याचा काटा टोचल्यास इजा होते.*

### *साफ करण्याची कला*

*हा मासा साफ करण्यासाठी चुलीतील राख वापरतात. ती नसेल तर तांदळाचे पीठ वापरतात. डोक्याजवळील काटा हातात राखाडी घेऊन मोडावा लागतो. काहीजण तो सुरी किंवा विळीने कापून टाकतात.*

